


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १५९ * नांदेड * सोमवार, दि. १५ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## पंढरपूरजवळील भाविकांचे वाहन विहिरीत कोसळले; ८ जण ठार

### मृतांच्या वारसांना मुख्यमंत्र्यांनी केली ५ लाखांची मदत जाहीर



**सोलापूर (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील म्हसवड येथील सिद्धनाथाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांच्या पिकअप गाडीचा तांदूळवाडी गावाजवळ भीषण अपघात झाला. भाविकांनी भरलेली ही पिकअप थेट रस्त्याशेजारील विहिरीत पडली. या भीषण दुर्घटनेत ८ जणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला असून, ७ जणांना वाचवण्यात यश आले आहे. या घटनेवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी येथे एक वाहन खाजगी शेतातील विहिरीत पडल्याने झालेल्या अपघातात काही भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. सुदैवाने ७ जणांचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. त्यांच्यावर उपचार केले जात आहेत.जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक दोघेही तातडीने घटनास्थळी रवाना झाले आहेत आणि स्थानिक प्रशासनाशी आम्ही सातत्याने संपर्कात आहोत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. या घटनेतील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकारकडून देण्यात येईल अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

म्हसवड-पंढरपूर मार्गावर प्रवास करणारे पिकअप वाहन विहिरीत कोसळून भीषण अपघात झाला. या वाहनातील सर्व प्रवासी पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावचे रहिवासी आहेत. ते म्हसवड येथील सिद्धनाथ देवस्थानाच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून गावाकडे परत येत असताना तांदूळवाडी परिसरात हा दुर्दैवी अपघात घडला. या अपघातात प्राण गमावलेल्या सर्व भाविकांना राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत असेही सुनेत्रा पवार म्हणाल्या. मी स्वतः जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून या घटनेची माहिती घेतली असून संबंधितांना तातडीनं आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

#### इरफानने ५ जणांचा जीव वाचवला

सुदैवाने या गाडीच्या मागेच तांदूळवाडी येथील इरफान मुजावर हा तरुण दुचाकीवरून येत होता. टेम्पो पाण्यात पडल्याचे पाहून त्याने तातडीने गावात मदतीसाठी फोन केले. याचवेळी एक लहान बाळ पाण्यात बुडत असल्याचे पाहून तत्काळ इरफानने पाण्यात उडी घेतली आणि या चिमूरड्यासह बुडणाऱ्या पाच भाविकांचा जीव वाचवला.

## नांदेड जिल्ह्यात जोरदार वादळीवाऱ्यासह पाऊस

### महावितरणचे हिमायतनगरमध्ये मोठे नुकसान





**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व जिल्ह्यात रविवारी सायंकाळी अचानक ढग जमून जोरदार वादळी-वाऱ्यासह पाऊस पडला. वेगवान वाऱ्यामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी झाडे कोलमडून पडली तर महावितरणचे खांब कोसळले. नांदेड शहरातही एका महिलेच्या व लहान चिमुकलीच्या अंगावर झाडाची फांदी पडली, परंतु ती बालंबाल बचावली. पावसामुळे शहरात बराच वेळ महावितरणचा वीज पुरवठाही खंडित झाला होता.

नांदेड शहर व परिसरात विशेष करून हिमायतनगर आणि अर्धापूर तालुक्यात महावितरणचे मोठे नुकसान झाले आहे. हिमायतनगर तालुक्यात विजेच्या डीपी, खांबासह तारा तुटून चांगलाच फटका बसला. यामुळे या भागातील वीज पुरवठा खंडित झाला होता. नांदेड शहरातही अचानक आलेल्या पावसाने एकच धावाधाव सुरू झाली. त्यातच वीज वितरण कंपनीचा पुरवठा खंडित झाल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य दिसत होते. शहरात काही भागात जोरदार ते मध्यम पाऊस पडला, तर ग्रामीण भागातही पावसाच्या चांगल्या सरी कोसळल्या. या पावसामुळे तापमानात बदल झाला असून नांदेडकरांना तुर्तास उकाड्यापासून सुटका मिळाली आहे.

## उद्धव ठाकरे यांनी बोलाविलेल्या खासदारांच्या बैठकीला ४ जण प्रत्यक्ष तर ५ जणांची ऑनलाईन हाजेरी

**मुंबई (प्रतिनिधी)** – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवार, १४ जून रोजी मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी बोलावलेल्या लोकसभा खासदारांच्या बैठकीबाबत अत्यंत महत्त्वाची आणि मोठी माहिती समोर आली आहे. सुरुवातीला काही खासदार गैरहजर आणि 'नॉट रिचेबल' असल्याच्या जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या होत्या. मात्र, खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेऊन या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. उद्धव ठाकरेंनी बोलावलेल्या बैठकीला पक्षाचे सर्वच्या सर्व ९ खासदार उपस्थित होते, अशी माहिती राऊत यांनी दिली आहे.

एकनाथ शिंदे यांच्या 'ऑपरेशन टायगर'च्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार फुटणार अशा वावड्या उठवल्या जात होत्या. मात्र, आजच्या बैठकीने ठाकरे गटाने आपली एकजूट दाखवून दिली आहे. वैयक्तिक आणि कौटुंबिक कारणांमुळे जे खासदार मुंबईत येऊ शकले नाहीत, त्यांनी डिजिटल माध्यमातून या बैठकीला हजेरी लावली.



'मातोश्री'वर प्रत्यक्ष उपस्थित राहिलेले खासदार-अरविंद सावंत (खासदार, दक्षिण मुंबई), अनिल देसाई (खासदार, दक्षिण मध्य मुंबई), राजाभाऊ वाजे (खासदार, नाशिक), संजय दिना पाटील (खासदार, ईशान्य मुंबई).

ऑनलाईन उपस्थित असलेले खासदार – अपरिहार्य कारणांमुळे जे खासदार प्रत्यक्ष येऊ शकले नाहीत, त्यांनी ऑनलाईन हजेरी नोंदवली. भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी): सकाळपासून वाकचौरे 'नॉट रिचेबल' असल्याच्या अफवा होत्या. मात्र, त्यांच्या पत्नी आजारी असल्याने ते मुंबईत येऊ शकले नाहीत. त्यांनी ऑनलाईन पद्धतीने बैठकीत सहभाग घेतला. ओमराजे निंबाळकर (धाराशिव): ओमराजे यांच्या मुलाच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्याला पुण्यात रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मुलासोबत रुग्णालयात असतानाही ओमराजे यांनी या महत्त्वाच्या बैठकीला ऑनलाईन हजेरी लावली. संजय देशमुख (यवतमाळ): घरी पुढच्या महिन्यात मुलीचे लग्न असल्याने ते येऊ शकले नाहीत, त्यांनीही ऑनलाईन हजेरी लावली. नागेश पाटील-आष्टीकर (हिंगोली) : त्यांचा मुलगा विधान परिषद निवडणूक लढवत असल्यामुळे आणि मतदारसंघात व्यस्त असल्याने त्यांनी ऑनलाईन माध्यमातून आपले मत मांडले. संजय जाधव (परभणी): मतदारसंघात पूर्वनियोजित कौटुंबिक 'धोंडे जेवण' कार्यक्रम असल्यामुळे त्यांनी फोनवरून या बैठकीत सक्रिय सहभाग घेतला.

## आता गाड्या १०० टक्के इथेनॉलवर चालतील, सरकारची मंजुरी -गडकरी

**नागपूर (प्रतिनिधी)** –केंद्र सरकारने देशात १०० टक्के शुद्ध इथेनॉलचा इंधन म्हणून वापर करण्यास मंजुरी दिली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर येथे एका पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

त्यांनी सांगितले की, या निर्णयाशी संबंधित नियम आणि नियमावलीला अंतिम रूप देणाऱ्या फाईलवर त्यांनी स्वाक्षरी केली आहे. या निर्णयाचा मुख्य उद्देश देशाचे कच्च्या तेलाच्या (जीवाश्म इंधन) आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि वाहतूक क्षेत्रातून होणारे प्रदूषण रोखणे हा आहे.

केंद्रीय मंत्र्यांनी सांगितले की, देशातील ऑटोमोबाइल क्षेत्राने हा बदल स्वीकारला आहे आणि अनेक मोठ्या कंपन्या १००% इथेनॉलवर चालणारी वाहने बाजारात आणण्यासाठी पूर्णपणे तयार आहेत. गडकरींच्या मते, टोयोटा, सुझुकी, एमजी आणि ह्युंदाईसह इतर कंपन्या पुढील ६ आठवड्यांच्या आत त्यांचे असे नवीन मॉडेल्स भारतीय बाजारात लॉन्च करणार आहेत.

## 'टीएमसी'चे बंडखोर खासदार भाजप प्रभारी व लोकसभा अध्यक्षांना भेटले

**कोलकाता (वृत्तसंस्था)** – तृणमूल काँग्रेसचे बंडखोर खासदार 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी'मध्ये सामील होणार आहेत. रविवारी दिल्लीत अनेक बंडखोर खासदारांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांची भेट घेतली. त्याआधी, त्यांनी केंद्रीय मंत्री आणि पश्चिम बंगाल भाजपचे प्रभारी भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानीही एक बैठक घेतली.

या बैठकीनंतर, बंडखोर खासदार काकोली घोष आणि सुदीप बंडोपाध्याय यांनी सांगितले की, २० खासदार 'एनसीपी' मध्ये विलीन होतील. काकोली घोष म्हणाल्या की, त्यांचा गट आता राष्ट्रीय हितासाठी काम करेल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील 'एनडीए'ला पाठिंबा देईल.

दरम्यान, ममता गटातील खासदार कीर्ती आझाद आणि सागरिका घोष यांनीही लोकसभेच्या सभापतींची भेट घेतली. त्यांनी असा दावा केला की, 'टीएमसी' म्हणजे केवळ खासदार आणि आमदारांचा समूह नाही, तर ती ममता बॅनर्जी यांनी उभी केलेली पक्षसंघटना आहे; त्यामुळे त्यांचाच गट हा 'खरा' 'टीएमसी' आहे. 'टीएमसी'चे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनीही सभापती ओम बिर्ला यांना पत्र लिहून मागणी केली आहे की, लोकसभेत 'टीएमसी'ला एकच पक्ष म्हणून मान्यता दिली जावी आणि कोणत्याही वेगळ्या गटाला मान्यता दिली जाऊ नये.

सध्या, पश्चिम बंगालमधून 'टीएमसी'चे २८ लोकसभा खासदार आहेत. पक्षाचे राज्यसभेतही १३ खासदार आहेत, ज्यापैकी चौघांनी आधीच पक्ष आणि आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. याव्यतिरिक्त, ८० पैकी ६० हून अधिक आमदारांनी एक वेगळा गट स्थापन केला आहे.

## बिहार पोलीस भरती परीक्षेत राडा; पोलिसांचा थेट गोळीबार



**पटना (वृत्तसंस्था)** – देशात नीट आणि सीबीएसई परीक्षेत झालेला घोटाळा ताजा असतानाच आज बिहारमध्ये कॉन्स्टेबल भरती परीक्षेतही तुफानी राडा झाला. बिहारमध्ये कॉन्स्टेबल भरती परीक्षा होत आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी पाटलीपुत्र रेल्वे स्टेशनवर विद्यार्थ्यांनी राडा केला. परीक्षा देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी गैरव्यवस्थापनाचा आरोप केला. या घटनेप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी अनेक गाड्या थांबवल्या आणि स्टेशनवरील दुकाने व परीक्षेसाठीच्या विशेष ट्रेनची तोडफोड केली, ज्यामुळे स्टेशनभर काचेचे तुकडे उडाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस महानिरीक्षक जितेंद्र राणा यांना गोळीबार करावा लागला.

घटनास्थळी पोहोचलेले पाटणाचे जिल्हाधिकारी डॉ. त्यागराजन म्हणाले, मध्यरात्रीच्या सुमारास काही लोक गोंधळ घालत असल्याची माहिती आम्हाला मिळाली. आम्ही त्यांना थांबून उमेदवारांना सहकार्य करण्याची विनंती केली. दोन विशेष गाड्या आधीच सुरू असतानाही, काही समाजकंटकांनी वारंवार आपत्कालीन साखळी ओढून विशेष गाड्यांची मागणी केली. त्यागराजन यांनी असेही सांगितले की, आंदोलकांनी निघून जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अडवले. त्यामुळे आम्हाला सौम्य बळाचा वापर करावा लागला.

## पावसाची तूट भरून निघणार, भारतात चांगला मान्सून कोसळणार

### जपान आणि अमेरिकी संस्थेचा दिलासादायक अंदाज

**मुंबई (प्रतिनिधी)** –प्रशांत महासागरात अतिशय तीव्र 'एल निनो' सक्रिय झाला असून, तो १९५० नंतरचा सर्वात भीषण ठरण्याची शक्यता अमेरिकेच्या हवामान संस्थेने वर्तवली आहे. याचा थेट व विपरीत परिणाम भारतातील आणि महाराष्ट्रातील मान्सूनवर होत असून, पावसाचे प्रमाण कमी होणे व दुष्काळाचे सावट वाढण्याची भीती हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनच्या प्रवाहात अडथळे येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात चिंतेचं वातावरण आहे. याचदरम्यान, जपान आणि अमेरिकेच्या संस्थांनी एक दिलासादायक माहिती दिली आहे.

हिंदी महासागरात इंडियन ओशन डायपोल अर्थात आयओडी सकारात्मक होण्याची शक्यता आहे. तसं झाल्यास पावसाची तूट भरून निघेल, असा अंदाज आहे. जपान आणि अमेरिकेच्या संस्थांनी मान्सूनसाठी दिलासादायक अंदाज व्यक्त केला आहे. प्रशांत महासागरात 'एल निनो' सक्रिय झाल्याचं जाहीर झाल्यावर यंदाच्या मान्सून हंगामाविषयी सर्वच स्तरांतून चिंता व्यक्त होऊ लागली. मात्र, 'एल निनो'ची तीव्रता वाढत असताना जुलैमध्ये हिंदी महासागरात 'इंडियन ओशन डायपोल'ची सकारात्मक स्थिती विकसित होण्याचा अंदाज या संस्थांनी जाहीर केला आहे. आयएमडीने मात्र इंडियन ओशन डायपोल तटस्थ राहण्याचा अं

दाज व्यक्त केला होता.


## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर एनडीएच्या पहिल्या बॅचमध्ये १४ महिला अधिकारी सज्ज

**देहरादून (वृत्तसंस्था)**– सर्वोच्च न्यायालयाच्या २०२१ मधील ऐतिहासिक निर्णयामुळे नॅशनल डिफेन्स अकादमीमध्ये (एनडीए) महिलांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. यानुसार, एनडीएच्या पहिल्या महिला तुकडीतील १४ कॅडेट्सनी कठोर प्रशिक्षण पूर्ण करून आर्मी आणि एअरफोर्समध्ये अधिकारी म्हणून यशस्वीरित्या पदभार स्वीकारला आहे.

सात दशकांहून अधिक काळ फक्त पुरुषांसाठी खुले असलेल्या राष्ट्रीय रक्षा अकादमी (एनडीए) मधून प्रशिक्षण घेतलेल्या पहिल्या महिला बॅचमधील १४ कॅडेट्स आता लष्कर आणि वायुदलात अधिकारी पदावर



सज्ज झाल्या. इंडियन मिलिटरी अकादमी (आयएमए), देहरादून येथे नुकत्याच झालेल्या पासिंग आऊट परेडमध्ये ९ महिला कॅडेट्सची लेफ्टनंट म्हणून नियुक्ती करण्यात आली. भारतीय वायुसेना (इंडियन एअर फोर्स) हैदराबाद येथील एअर फोर्स अकादमी (एएफए), डुंडीगल येथे ५ महिला कॅडेट्स फ्लाइंग ऑफिसर म्हणून कमीशन झाल्या. या सर्व महिला अधिकाऱ्यांना थेट परमनंट कमिशन देण्यात आले. विशेष म्हणजे या पहिल्या महिला अधिकारी आहेत ज्यांना एनडीएच्या माध्यमातून पहिल्या दिवसापासूनच कायमस्वरूपी कमिशन मिळाले. त्यांचा प्रवास २०२१ मध्ये सुरू झाला, जेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महिलांसाठी एनडीएचे दरवाजे उघडले गेले.




## 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चा निव्वळ अफवा -खा. आष्टीकर

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी रविवार, दि. १४ जून रोजी राज्यातील राजकीय घडामोडींवर रोखठोक आणि स्पष्ट भूमिका पत्रकार परिषद घेऊन मांडली आहे. ते म्हणाले की, राज्यात सध्या सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या (ठाकरे गटाचे खासदार फुटणार असल्याच्या) चर्चा निव्वळ अफवा आहेत. सत्ताधारी पक्षाकडून जनतेचे मूळ मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी अशा प्रकारच्या वावड्या मुद्दाम उठवल्या जात आहेत. आम्ही निवडून आल्यापासून गेल्या दोन



वर्षांपासून रोजच हे ऑपरेशन सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, तालुकाप्रमुख सुनील कदम, पिंटू पाटील वासरीकर, विधान परिषद निवडणुकीचे उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर आदी उपस्थित होते.

खा. आष्टीकर म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार तसेच मंत्र्यांकडे मतदारसंघातील लोकांची व विकासाची कामे घेऊन जावेच लागते. त्या अनुषंगानेच आपण भेट घेतली होती. केवळ मुख्यमंत्र्यांना भेटलो याचा अर्थ पक्ष बदलणार असा काढणे अत्यंत चुकीचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबईत 'मातोश्री'वर झालेल्या पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकीला मी उपस्थित राहू शकलो नाही. याचे स्पष्टीकरण पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दिले आहे. त्यांच्या आदेशामुळे मी मुंबईत बैठकीला गेलो नसल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले.

**उद्धव ठाकरेंसोबतच राहणार**

आपण आणि ठाकरे गटाचे इतर सर्व खासदार पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत अत्यंत प्रामाणिकपणे खंबीरपणे उभे आहोत. आमच्यात कोणताही संभ्रम नाही आणि पक्ष सोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असेही खासदार आष्टीकर यांनी स्पष्ट करून पत्रकार परिषदेच्या माध्यमातून स्वतःभोवती निर्माण झालेल्या राजकीय चर्चांना पूर्णविराम दिला.

## भारताची रशियाकडून तेल खरेदी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पाश्चात्य देशांचे भू-राजकीय दबाव आणि निर्बंध झुगारून भारताने रशियाकडून जीवाश्म इंधनाची मोठी खरेदी सुरूच ठेवली आहे. युरोपियन थिंक टँक 'सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर'च्या ताज्या अहवालानुसार, मे २०२६ मध्ये भारत रशियाकडून जीवाश्म इंधन आयात करणारा जगातील दुसरा सर्वात मोठा देश ठरला आहे. भारताने या एकाच महिन्यात रशियाकडून अंदाजे ५.८ अब्ज युरो (सुमारे ६.७ अब्ज डॉलर) किमतीचे हायड्रोकार्बन आयात केले आहेत.

या एकूण आयातीमध्ये कच्च्या तेलाचा वाटा सर्वाधिक म्हणजे ८३ टक्के (४.८ अब्ज युरो) होता. याव्यतिरिक्त, ५५० दशलक्ष युरोची तेल उत्पादने आणि ४२९ दशलक्ष युरो किमतीच्या कोळशाची आयात करण्यात आली. अहवालानुसार, भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी रशियाकडून मिळणाऱ्या सवलतीच्या दरातील तेलाची खरेदी वाढवल्यामुळे, एप्रिलच्या तुलनेत मे महिन्यात भारताच्या एकूण कच्च्या तेलाच्या आयातीत ८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. भारताच्या या वाढीव आयातीमागे रशियाकडून होणाऱ्या पुरवठ्यातील २१ टक्क्यांची वाढ हे मुख्य कारण आहे. एप्रिलच्या तुलनेत मे महिन्यात गुजरातच्या 'वडीनार रिफायनरी'मध्ये रशियन तेलाचे अनलोडिंग ३६ टक्क्यांनी वाढले, तर 'जामनगर रिफायनिंग कॉम्प्लेक्स'मध्ये हे प्रमाण १४ टक्क्यांनी वाढले. नोव्हेंबर २०२५ मध्ये रशियन तेलाची आयात थांबवणाऱ्या 'न्यू मंगळूर' आणि 'विशाखापट्टणम' या सरकारी रिफायनरींनी मार्च २०२६ पासून पुन्हा खरेदी सुरू केली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# ही तर मानवाची विनाशाकडे वाटचाल!

पृथ्वीवरील तापमानवाढीचा धोका आता भविष्यातील संकट राहिलेला नाही, तर तो वर्तमानातील कठोर वास्तव बनला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या नव्या हवामान अहवालाने पुन्हा एकदा जगाला धोक्याची घंटा ऐकवली आहे. पुढील पाच वर्षांत पृथ्वीचे तापमान सुरक्षित मानल्या गेलेल्या १.५ अंश सेल्सिअसच्या मर्यादेपेक्षा अधिक वाढण्याची ७५ टक्क्यांहून अधिक शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, मानवजातीने स्वतःच्या हाताने निर्माण केलेल्या संकटाचा अंतिम टप्पा आता जवळ येऊ लागला आहे. औद्योगिक क्रांतीनंतर विकासाच्या नावाखाली मानवाने निसर्गाची प्रचंड हानी केली. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांचा अमर्याद वापर, जंगलांची मोठ्या प्रमाणावर तोड, काँक्रीटची वाढती जंगले आणि अति उपभोगवादी जीवनशैली यामुळे वातावरणातील कार्बनडाय ऑक्साइडचे प्रमाण सातत्याने वाढले. परिणामी पृथ्वीभोवती उष्णतेचे जाळे तयार झाले आणि हवामानाचा समतोल बिघडला. आज जगभरात दिसणाऱ्या नैसर्गिक आपत्ती या त्याच मानवी चुकीचे परिणाम आहेत. कधी विक्रमी उष्णता, कधी मुसळधार पाऊस, तर कधी भीषण दुष्काळ अशा संकटांनी संपूर्ण जगाला वेढले आहे. अंटार्क्टिका आणि ग्रीनलँडमधील हिमनद्या वेगाने वितळत आहेत. समुद्राची पातळी वाढत असून, किनारी भागातील लाखो लोकांचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. ॲमेझॉनच्या जंगलांमध्ये वाढणारे वणवे आणि आर्क्टिक भागातील तापमानवाढ ही निसर्गाच्या संतुलनाला लागलेली मोठे तडे आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालातील सर्वात गंभीर बाब म्हणजे २०२६ ते २०३० या काळात पृथ्वीवरील किमान एक वर्ष १.५ अंश सेल्सिअसची मर्यादा निश्चितपणे ओलांडेल, अशी तब्बल ९१ टक्के शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजेच पॅरिस हवामान करारात आखून दिलेली सुरक्षित मर्यादा आता कागदावरच उरण्याची भीती निर्माण झाली आहे. ही केवळ तापमानातील वाढ नाही तर मानवी आरोग्य, अन्नसुरक्षा, पाण्याची उपलब्धता आणि जैवविविधतेवर येणारे मोठे संकट आहे. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये याचे परिणाम अधिक गंभीर ठरणार आहेत. आधीच अनेक राज्यांमध्ये पाण्याची टंचाई वाढत आहे. शेतकऱ्यांचे पीक अवकाळी पाऊस, गारपीट आणि दुष्काळामुळे उद्ध्वस्त होत आहे. शहरांमध्ये उष्णतेच्या लाटा जीवघेण्या बनत आहेत. गरीब आणि कष्टकरी वर्गाला या संकटाचा सर्वाधिक फटका बसत आहे. परंतु तरीही पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीत आपण पुरेसे गंभीर दिसत नाही. वास्तविक पाहता, हवामान बदलासाठी केवळ सरकारे जबाबदार नाहीत; सामान्य नागरिकांचाही त्यात मोठा वाटा आहे. अनावश्यक वाहनांचा वापर, विजेचा अपव्यय, प्लास्टिकचा अतिरेक, झाडांची कत्तल आणि अति उपभोगवादी जीवनशैली यामुळे संकट अधिक गडद होत आहे. विकासाच्या स्पर्धेत मानवाने निसर्गाशी युद्ध सुरू केले आहे आणि त्याची किंमत संपूर्ण पृथ्वीला मोजावी लागत आहे. अजूनही वेळ गेलेली नाही; पण आता तातडीने कठोर पावले उचलावी लागतील. सर्वप्रथम जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करून सौर, पवन आणि जलऊर्जेसारख्या स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे गरजेचे आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करून खासगी वाहनांचा वापर कमी केला पाहिजे. मोठ्या शहरांमध्ये हरित क्षेत्र वाढवणे आणि वृक्षतोडीवर कठोर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षण अधिक प्रभावी करणे हीदेखील काळाची गरज आहे. मुलांना निसर्गाशी जोडणारे शिक्षण दिले गेले पाहिजे. उद्योगांनीही केवळ नफ्याच्या दृष्टीने नव्हे, तर पर्यावरणीय जबाबदारी लक्षात घेऊन उत्पादन प्रक्रिया बदलल्या पाहिजेत. सरकारने पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या प्रकल्पांवर कठोर नियम लागू करणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनीही जीवनशैलीत बदल करणे आवश्यक आहे. पाण्याची बचत, प्लास्टिकचा कमी वापर, ऊर्जा बचत, स्थानिक उत्पादनांना प्राधान्य आणि वृक्षारोपण यांसारख्या छोट्या कृती मोठा बदल घडवू शकतात. हवामान बदल ही केवळ शास्त्रज्ञांची चिंता नाही; ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. निसर्ग आज वारंवार इशारे देत आहे. पूर, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि वितळणाऱ्या हिमनद्या हे केवळ अपघात नाहीत, तर मानवाला दिलेले स्पष्ट संकेत आहेत. जर आजही आपण जागे झालो नाही, तर उद्याची पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही. पृथ्वी वाचवायची असेल, तर विकासाचा मार्ग बदलावा लागेल. अन्यथा तापणारी पृथ्वी आणि थंडावलेली मानवी संवेदना मानवजातीच्या विनाशाचे कारण ठरतील.

# वृद्धांचा सन्मान: अत्याचारमुक्त समाजाची गरज



१५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस वृद्ध व्यक्तींवरील वाढत्या अत्याचारांच्या समस्येकडे समाजाचे, शासनाचे आणि जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांपैकी वृद्धत्व हा अत्यंत संवेदनशील आणि अपरिहार्य टप्पा आहे. प्रत्येक व्यक्तीला एक ना एक दिवस या अवस्थेत प्रवेश करावाच लागतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात सन्मान, सुरक्षितता, प्रेम आणि आधार मिळणे अपेक्षित असते. परंतु बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये, वाढत्या व्यक्तिकेंद्री विचारसरणीमध्ये आणि कौटुंबिक नात्यांमधील दुराव्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृद्ध अत्याचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न बनला आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते. अनेक ग्रंथांमध्ये आई-वडिलांचा सन्मान करण्याची शिकवण देण्यात आली आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वृद्ध व्यक्ती हे कुटुंबाचे मार्गदर्शक, निर्णयकर्ते आणि अनुभवांचे भांडार मानले जात होते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढ्यांच्या घडणीत होत असे. परंतु कालांतराने औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणासाठी व रोजगारासाठी होणारे स्थलांतर, अणुकुटुंबपद्धतीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यांमुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्थान बदलू लागले. अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो.

वृद्ध अत्याचार ही संकल्पना व्यापक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, विश्वासाच्या नात्यामध्ये वृद्ध व्यक्तीवर होणारी कोणतीही कृती किंवा दुर्लक्ष ज्यामुळे त्या व्यक्तीला हानी, दुःख किंवा त्रास सहन करावा लागतो, त्याला वृद्ध अत्याचार असे म्हणतात. हा अत्याचार शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक किंवा सामाजिक स्वरूपाचा असू शकतो. अनेकदा अत्याचार करणारी व्यक्ती ही वृद्ध व्यक्तीची स्वतःची मुले, नातेवाईक, काळजीवाहक किंवा इतर परिचित व्यक्ती असते. त्यामुळे या प्रकारच्या अत्याचाराची तीव्रता अधिक वाढते.

शारीरिक अत्याचारामध्ये वृद्धांना मारहाण करणे, त्यांना जबरदस्तीने ढकलणे, त्यांच्या हालचालींवर बंधने घालणे किंवा आवश्यक वैद्यकीय उपचारांपासून वंचित ठेवणे यांचा समावेश होतो. वृद्ध व्यक्तींची शारीरिक क्षमता कमी झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या अत्याचारांचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. मानसिक किंवा भावनिक अत्याचारामध्ये सतत अपमान करणे, त्यांची टिंगल करणे, धमकावणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना कुटुंबातील निर्णयांपासून दूर ठेवणे यांचा समावेश होतो. यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये नैराश्य, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनाची संकल्पना वृद्ध व्यक्तींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. संयुक्त राष्ट्रसंघाने वृद्ध व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणाला प्राधान्य देत या विषयाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू केले. या दिवसाचा उद्देश वृद्ध अत्याचाराविषयी जनजागृती निर्माण करणे, अत्याचाराची कारणे आणि परिणाम समजून घेणे तसेच त्याच्या प्रतिबंधासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

भारतामध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा आणि वाढलेले आयुर्मान यांमुळे वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. लोकसंख्येतील या बदलामुळे वृद्धांच्या गरजा, समस्या आणि हक्क यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरले आहे. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सेवा, सामाजिक संरक्षण आणि भावनिक आधार या वृद्धांच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु अनेक वृद्ध व्यक्तींना या गरजांची पूर्तता होत नसल्याचे दिसून येते.

वृद्ध अत्याचारामागील कारणांचा विचार केला असता अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक घटक समोर येतात. आर्थिक अवलंबित्व हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. अनेक वृद्ध व्यक्ती निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. काही वेळा संपत्तीच्या वादांमुळे किंवा आर्थिक स्वार्थापोटी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक तणाव आणि काळजीवाहकांवर येणारा मानसिक ताण यांमुळेही वृद्ध अत्याचाराची शक्यता वाढते.

अत्याचाराचे परिणाम वृद्ध व्यक्तींच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असतात. सततचा मानसिक ताण, अपमान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांच्यामध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. शारीरिक अत्याचारामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. काही वृद्ध व्यक्ती अत्याचार सहन करण्यास कंटाळून सामाजिक जीवनापासून दूर जातात. अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ शकतात.

वृद्ध महिलांची परिस्थिती विशेषतः अधिक संवेदनशील असते. विधवापण, आर्थिक परावलंबित्व, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना अधिक असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अधिक तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे वृद्ध महिलांसाठी विशेष धोरणे आणि संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज आहे.

भारतात वृद्धांच्या संरक्षणासाठी विविध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि वरिष्ठ नागरिक यांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा कायदा त्यापैकी महत्त्वाचा आहे. या कायद्याअंतर्गत मुलांना आणि वारसदारांना वृद्ध पालकांच्या देखभालीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वृद्ध व्यक्तींना त्यांच्या पालनपोषणासाठी न्यायाधिकरणामार्फत आर्थिक सहाय्य मिळविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय, वृद्धांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठीही विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य शासनाकडून वृद्धांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, आरोग्यविषयक सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सवलती, हेल्पलाइन सेवा आणि वृद्धाश्रमांच्या माध्यमातून वृद्धांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही वृद्धांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वृद्धांसाठी समुपदेशन सेवा, आरोग्य तपासणी शिबिरे, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करून त्यांना मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. अशा संस्थांच्या कार्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना नव्याने जगण्याची प्रेरणा मिळते.

कुटुंब ही वृद्धांच्या संरक्षणाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. वृद्धांना प्रेम, सन्मान आणि भावनिक आधार देणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. वृद्धांना ओझे समजण्याऐवजी त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन हा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींशी कसे वागतो, त्यांच्या गरजांकडे कितपत लक्ष देतो आणि त्यांना कितपत सन्मान देतो याचा विचार करण्याची गरज आहे. वृद्धांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून ती आपल्या संस्कृतीची आणि मानवतेची खरी ओळख आहे.

समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाच्या निकषांवर करता येत नाही. तो समाज आपल्या दुर्बल आणि ज्येष्ठ घटकांशी कसा वागतो यावरही त्याचे मूल्यमापन केले जाते. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करणारा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि त्यांना सुरक्षित व आनंदी जीवन जगण्याची संधी देणारा समाजच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि प्रगत ठरतो.

१५ जूनच्या निमित्ताने आपण सर्वांनी वृद्ध अत्याचाराला ठामपणे नकार देण्याचा संकल्प केला पाहिजे. शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे कार्य करून वृद्धांसाठी अत्याचारमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविणे आणि त्यांच्या जीवनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीच या दिनाची खरी सार्थकता ठरेल.

आज आपण वृद्धांचा सन्मान करू, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि त्यांना प्रेमाने साथ देऊ, तर उद्याच्या आपल्या वृद्धत्वालाही सन्मानाची हमी मिळेल. त्यामुळे 'वृद्धांचा आदर - अत्याचाराला नकार' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. वृद्धांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आणि अत्याचारमुक्त वृद्धत्व हीच सभ्य समाजाची खरी ओळख आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# जसपाल राणा; भारताचे सर्वोत्कृष्ट नेमबाज आणि प्रशिक्षक

भारताचे सर्वोत्कृष्ट पिस्तूल नेमबाज आणि आणि पॅरिस ऑलिम्पिक मध्ये मनू भाकरला दोन पदके मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणारे प्रशिक्षक जसपाल राणा यांचे शुक्रवारी हृदय विकाराच्या झटक्याने अकस्मात निधन झाले त्यांच्या निधनाने क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे.

जसपाल राणा हे अवघ्या ४९ वर्षाचे होते. हे वय जाण्याचे नव्हतेच म्हणूनच त्यांचे निधन सर्वांना चटका लावून जाणारे ठरले. भारतातीलच नाही तर जगातील सर्वोत्कृष्ट नेमबाजांपैकी एक असणाऱ्या जसपाल राणा यांचा जन्म २८ जून १९७६ रोजी उत्तरकाशी येथे झाला. जसपाल राणा यांचे वडील नारायण सिंह राणा यांनी १९७१ च्या युद्धात इंडो तिबेटियन बॉर्डर पोलिसमध्ये सेवा बजावली होती आणि नंतर ते उत्तराखंडचे पहिले क्रीडामंत्री बनले. जसपाल राणा यांना लहानपणापासूनच नेमबाजीची आवड होती. त्यांच्या वडिलांनीच त्यांना नेमबाजीतील बाळकडू पाजले. त्यांचे वडील हेच त्यांचे नेमबाजीतील पहिले गुरू होते. वयाच्या १२ व्या वर्षीच त्यांनी नेमबाजीतील राष्ट्रीय स्तरावरील पहिले सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर त्यांनी देशांतर्गत स्पर्धेत पदकांचा धडाका सुरू केला.

जसपाल राणा यांनी आपल्या कारकिर्दीत ६०० हून अधिक पदके जिंकले. १९९४ साली राष्ट्रकुल आणि आशियाई स्पर्धेत त्यांनी भारताच्या नेमबाजी संघाचे नेतृत्व केले. या दोन्ही महत्वाच्या आणि मोठ्या स्पर्धेत त्यांनी २५ मिटर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. २००६ सालच्या दोहा आशियाई क्रीडा स्पर्धेत यांनी तत्कालीन विश्वविक्रमाची बरोबरी करत तीन सुवर्णपदक व एक रौप्य पदक मिळविले होते.

जसपाल राणा यांनी राष्ट्रकुल स्पर्धेत चारवेळा सहभाग घेतला आणि ९ सुवर्णपदकांसह १५ पदके मिळवली. ते राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताचे सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू आहेत. राष्ट्रकुल असो की आशियाई क्रीडा स्पर्धा जसपाल राणा यांचे सुवर्णपदक निश्चित असायचे मात्र दुर्दैवाने त्यांना ऑलिम्पिकचे पदक मिळवता आले नाही. आपण जरी ऑलिम्पिक पदक मिळवू शकलो नाही तर देशासाठी ऑलिम्पिक पदक मिळवणारे खेळाडू निर्माण करण्याचे त्यांनी ठरवले आणि निवृत्ती नंतर खेळाडूंना



नेमबाजीचे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. २०१२ सालापासून ज्युनिअर पिस्तूल प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या जसपाल राणा यांनी सौरभ चौधरी,

अनिश भानवाला आणि चिंकी यादव यासारख्या तरुण नेमबाजांना घडवलं. जसपाल राणा यांच्या कठोर प्रशिक्षण आणि मार्गदर्शनामुळे मनू भाकरने २०२४ च्या पॅरिस ऑलिंपिकमध्ये दोन कसंस्यादक जिंकले. प्रशिक्षक म्हणून हे त्यांचे सर्वात मोठे यश होते. खेळातील त्यांच्या अफाट योगदानाची आणि नेमबाजांच्या पुढील पिढीला घडवण्यात बजावलेल्या भूमिकेची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना २०२० साली प्रतिष्ठित द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या अचानक जाण्याने खेळाडूंना मोठा धक्का बसला आहे.

मनू भाकरने ही बातमी ऐकताच आपला सामना थांबवला आणि पिस्तूल खाली टाकत जमिनीवर बसून रडू लागली. जसपाल राणा यांच्या निधनाने त्यांच्या शिष्यांचेच नाही तर संपूर्ण क्रीडा विश्वाचे मोठे नुकसान झाले आहे. एक खेळाडू आणि मार्गदर्शक म्हणून त्यांनी तरुण प्रतिभावंत खेळाडू घडवून क्रीडा विश्वात अतुल्य योगदान दिले. त्यांचे योगदान येणाऱ्या पिढीतील खेळाडूंना प्रेरणा देणारे ठरेल. जसपाल राणा यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# शाळा म्हणजे समाजाची प्रतिकृती

आज शाळेचा पहिला दिवस. दरवर्षी शाळा १५ जूनला सुरू होतात. त्यामुळे शाळेत जाण्यासाठी मुले उत्सुक असतात. नवे वर्ग, नवे मित्र, मैत्रिणी, नवे पुस्तके, नवा गणवेश, नवीन बॅग, नवे शूज सर्व काही नवे नवे यामुळे मुलांच्या आनंदाला पारावर उरत नाही. प्रदीर्घ सुट्टी उपभोगून मुले आपापल्या विद्यालयात दाखल होतात. काही मित्र-मैत्रिणी आई-वडिलांच्या बदलीच्या निमित्ताने विद्यालय सोडून दुसरीकडे प्रवेश घेतात. त्यामुळे त्यांचा सहवास मिळत नाही

मनाला हुरहुर लागते. काही इतर कारणाने शाळेत विद्यार्थी येऊ शकत नाहीत. त्यामुळे मन उदासीन होते. सर्व सवंगडी एकत्रित येऊन केलेली शाळा वेगळीच असते. शाळेत संस्कार शिकविले जातात ते आयुष्यभर आपणाला बांधून ठेवतात. म्हणून शाळा ही संस्काराची विद्यापीठ असते. शाळेत अनेक जाती-धर्माचे मित्र मैत्रिणी मिळतात. त्यांना जात-पात सुद्धा कळत नसते, सर्वजण आपण एक आहोत ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण होते ही किमया शाळेची असते. शाळा सर्वांना सारखा न्याय देते,म्हणून शाळेला विद्यामंदिर ही म्हणतात. प्रत्येक व्यक्ती शाळेतून शिकून मोठा होतो, अनेक वर्षे तो शाळेत गेलेला असतो, त्याला आज जरी मोठी नोकरी लागली तरी तो शाळा विसरत नाही. गावापासून दूर नोकरीसाठी गेलेली व्यक्ती गावाची आठवण काढताना शाळेची विचारपूस हमखास करतात.



शाळेने अनेकांना मोठे केले.भेदभाव काढून टाकले. अंगत पंगत करून जेवण दिले. खेळताना धमाल केली. वर्गातील शिस्तीमुळे अनेकांना आयुष्याची शिस्त लागली .संस्काराचे धडे मिळाले. छडी लागल्यामुळे विद्येचे महत्त्व कळाले. छडीमुळे आम्ही आज स्वतःच्या पायावर उभे राहिलो,शिक्षा झाली. म्हणून आम्ही आज अधिकारी आहोत. गुरुजींनी शिक्षा केली नसती तर आम्ही आज रिकाम टेकडे राहिलो असतो, असे अनेक जण प्रांजळपणे चार-चौघांत सांगतात. हे सांगताना त्यांना थोडाही कमीपणा वाटत नाही, म्हणून गुरुजींनी शिस्त लावून शिक्षा केली हे त्याकाळी फार चांगले झाले. गुरुजींनी शिक्षा केले म्हणून घरातील लोकांना ही सांगता येत नसत, सांगितले तर घरी सुद्धा मार खाण्याची वेळ येत असे, म्हणून अभ्यास केल्याशिवाय पर्याय नव्हता, पाढे, पाठांतर करावे लागत होते. शब्दार्थ, सूत्र, पाठांतर करून वर्गात बसावे लागत होते, नाहीतर वेताची छडी असायची. टेबलावर हात ठेवून गुपचूप उभे राहावे लागत असे.शाळेचा पहिला दिवस आजही मला आठवतो, काही मुले रडत रडत येतात, पण शाळा शिकतात.ते दिवस कोणीही विसरू शकत नाहीत. प्रत्येक आईला आपला मुलगा शिक्षण शिकावा, मोठा व्हावा असे वाटत असते, म्हणून ती मुलांना शाळेत आणून सोडते, जे शाळेत मार खाऊन शिकले ते समाजाच्या प्रवाहात उतरले. जे शिकले नाहीत त्यांना शाळेची आठवण पुन्हा पुन्हा येते. केलेल्या चुका हमखास आठवतात इतरांकडे पाहून शाळेचे स्मरण होते. 'गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी असे म्हणावे लागते. ज्येष्ठ समाज सुधारक अण्णा हजारे म्हणतात मी घरी गृहपाठ केलो नव्हतो आणि शाळेत खोटे बोललो, वही घरी राहिली, असे गुरुजींना सांगितले. गुरुजी म्हणाले जा? घरी जाऊन गृहपाठाची वही घेऊन परत शाळेत ये, तेव्हा मी घरी गेलो,आईला खरे सांगितले.तेव्हा आई सुद्धा माझ्या सोबत शाळेत आली. त्यानंतर माझी कशीबशी सुटका झाली असे दिलखुलासपणे ते त्यांच्या आत्मचरित्रात लिहितात.शाळेने संस्कार व नीतिमत्ता शिकविले.

म्हणून शाळेचा पहिला दिवस मानवाच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण असतो, तो मानवाला धर्म, तत्वे, नीती, न्याय, संस्कार सर्व काही शिकवते, शाळा पत्र्याची असो की, दगडांची असो त्या शाळेत शिकवणारे शिक्षक मुलांना संस्कार देतात. प्रत्येक शाळेत योग्य ज्ञान मिळते ते ज्ञान आपण कसे आत्मसात करतो, यावर बरेच काही अवलंबून आहे. शाळेला कोणीही दोष देऊ नये. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे शाळेत फक्त दोनच दिवस गेले आणि एवढे प्रचंड लोकसाहित्य लिहून काढले हे मुद्दाम येथे नमूद करावे वाटते. कारण शाळेनी त्यांना घडविले. त्यामुळे शाळा हे एक ज्ञानरूपी सरिता आहे.

७ नोव्हेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शाळेत गेले. तो त्यांचा पहिला दिवस होता, तो दिवस आज भारतभर विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जात आहे.

म्हणून शाळेला ज्ञानाचे भांडार म्हणतात. तसेच शाळेला विद्यार्थ्यांचे दुसरे घर ही म्हणतात. शाळेत मित्र, मैत्रिणी, शिक्षक असतात. शाळा म्हणजे समाजाची प्रतिकृती होय. शाळेत मुलांचा भावनिक, बौद्धिक, मानसिक विकास होतो. कोमल बाल मनावर अनेक संस्कार विद्यालयात केले जातात. प्रत्येक मुलाची आवड वेगळी असते, त्यामुळे ते शिकतात गुरुवर्य रवींद्रनाथ टागोरांनी सर्व बालके एकत्रित करून शांतिनिकेतन ही शाळा सुरू केली म्हणून शाळेला एक संस्कार सरिता आपण म्हणूया! काळानुसार शिक्षण बदलत आहे म्हणून शाळेचा पहिला दिवस आज अतिशय आनंदाने घालूया! शाळेच्या पहिल्या दिवसाला खूप खूप शुभेच्छा.

**प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष: विठूमाऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता.मुखेड जि.नांदेड

# जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅली; दोन अल्पवयीन मुलांची सुटका

**नांदेड (प्रतिनिधी)** –जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त कामगार विभागामार्फत व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ कार्यालय परिसरातून करण्यात आला. सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जनजागृती रॅलीस प्रारंभ करण्यात आला.




यावेळी कामगार विभागाचे अधिकारी व कर्मचारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे प्रतिनिधी, महिला व बालविकास विभागाच्या जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे, कल्पना राठोड, चाईल्ड लाईनच्या दीपाली सूर्यवंशी, जस्टीस फॉर ऑलचे निलेश कुलकर्णी, विष्णू गोडबोले, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते तसेच इतर संबंधित विभागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅलीपूर्वी महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गांवरून जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान विविध आस्थापना, हॉटेल्स, व्यावसायिक प्रतिष्ठाने व मॉल्स यांना भेटी देण्यात आल्या. बालकामगार न ठेवण्याबाबत संबंधित आस्थापनांकडून हमीपत्रे घेण्यात आली. तसेच बालकामगार प्रतिबंधक संदेश असलेले स्टिकर्स लावून जनजागृती करण्यात आली.

अभियानादरम्यान माता रमामाता आंबेडकर चौक परिसरातील एका हॉटेलमध्ये अल्पवयीन मुलांकडून काम करून घेतले जात असल्याची बाब निदर्शनास आली. त्यानुसार कामगार विभागाने पोलीस विभागाच्या सहकार्याने संयुक्त कारवाई करून संबंधित अल्पवयीन मुलांची सुटका केली. पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

बालकामगार (प्रतिबंध व नियमन) सुधारणा अधिनियम, २०१६ नुसार १४ वर्षांखालील बालकांना कोणत्याही व्यवसायात अथवा प्रक्रियेत कामावर ठेवणे दंडनीय गुन्हा आहे. तसेच १४ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलांना धोकादायक व्यवसायांमध्ये रोजगार देण्यास मनाई आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या नियोक्त्यांवर कारावास व दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

कामगार विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कुठेही बालकामगार आढळून आल्यास त्याची माहिती तत्काळ कामगार विभाग, पोलीस विभाग किंवा संबंधित प्रशासनाला द्यावी. बालकामगारमुक्त समाज निर्मितीसाठी सर्व घटकांनी पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांनी नमूद केले.

# निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे : डॉ. माधवी खोडे-चवरे

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी दिले.



जिल्हा नियोजन भवन येथे या निवडणुकीच्या मतदान व मतमोजणीच्या अनुषंगाने आयोजित दुसऱ्या प्रशिक्षणात त्या बोलत होत्या.

प्रशिक्षणाला जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले, अप्पर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध कक्षाचे नोडल अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

निवडणूक कामांबाबत मतदारांची कोणतीही तक्रार येणार नाही यासाठी आपण दक्ष राहिले पाहिजे. आपल्याकडे निवडणूक कामांचा मोठा अनुभव असला तरी अतिआत्मविश्वास न बाळगता निवडणूक आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रियेत आपल्या हातून कोणतीही चूक होणार नाही याची संपूर्ण दक्षता सर्वांनी घ्यावी. निवडणूक कर्तव्य बजावताना समाज माध्यमाचा वापर अत्यंत काळजीपूर्वक व जबाबदारीने करावा, अशी सूचना निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी केली.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक पार पाडण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. मतदान व मतमोजणी केंद्रावर सुरक्षेच्यादृष्टिने सर्वांनी खबरदारी घ्यावी, असे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयांवर मार्गदर्शन केले तर उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांनी सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. योग्य पद्धतीने मतपेटी हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण यावेळी देण्यात आले.

या निवडणुकीचे मतदान गुरुवार १८ जून २०२६ रोजी संबंधित महसूल उपविभागाच्या मुख्यालयी असलेल्या तहसील कार्यालयात होणार असून या मतदानाची मोजणी सोमवार, २२ जून २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हा नियोजन भवन येथे होणार आहे.

# 'एमपीडीए' अंतर्गत सराईत गुन्हेगार शेख शमी हर्सुल कारागृहात स्थानबद्ध

**नांदेड (प्रतिनिधी)**– एमपीडीए अंतर्गत सराईत गुन्हेगार शेख शमी उर्फ अरबाज शेख रऊफ याच्या स्थानबद्धतेचा अहवाल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांना गेल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी त्याला स्थानबद्ध करण्याचा आदेश दिला आहे.

नांदेड जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार व गुन्हेगारांच्या टोळीविरुद्ध कडक कारवाई सुरु केली आहे. एमपीडीए व मोका अंतर्गत अनेक गुन्हेगारांना स्थानयद्ध करण्यात आले. तसेच काही गुन्हेगारांवर हद्दपारीची कार्यवाही करण्यात आली आहे. चालू वर्षात पोलीस प्रशासनाने जिल्ह्यातील तेरा गुन्हेगाराला एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्यात आले. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार शेख शमी उर्फ अरबाज पिता शेख रऊफ (वय २४, रा. मदनी कॉलनी, देगलूरनाका, नांदेड) याच्या विरुध्द विविध गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. पोलीस प्रशासनाकडून प्रतिबंधात्मक कार्यवाही करुनही शेख शमी उर्फ अरबाज याच्या वर्तवणुकीत कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शेख शमी उर्फ अरबाज याच्या विरुध्द एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी तयार करुन मंजुरीसाठी पाठविला होता. सदर प्रस्तावास जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शनिवार दि. १३ जून रोजी मंजुरी देवून स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी तत्काळ शेख शमी उर्फ अरबाज यास ताब्यात घेऊन त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली.

# 'निखिल कन्स्ट्रक्शन'ची मर्जी अन् महसूलचा 'डोळेझाक' कारभार

**भोकर (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र-तेलंगणा सीमावर्ती भागातील रहाटी जवळ 'निखिल कन्स्ट्रक्शन'द्वारे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामासाठी नियमांची पायमल्ली करून रात्रीच्या अंधारात मुरुमाचे अवैध उत्खनन केले जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. या अवैध उत्खननामुळे परिसरातील जमिनींची चाळण होत असतानाही भोकर महसूल प्रशासन मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

रस्त्याच्या कामासाठी लागणारा मुरूम उत्खनन करण्यासाठी प्रशासनाकडून ठराविक जागा आणि ठराविक घनफळाची परवानगी दिली जाते. मात्र, निखिल कन्स्ट्रक्शनने या नियमांचे सर्रास उल्लंघन करून नांदा-म्हैसा पट्टीतील माळरानातून शेतजमिनींमधून, सर्रासपणे मुरुमाचा उपसा सुरू केला आहे. विशेष म्हणजे, हे उत्खनन दिवसाढवळ्या न करता रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात हायवा आणि जेसीबीच्या साहाय्याने केले जात आहे. प्रशासनाचे स्थानिक अधिकारी या प्रकाराकडे सोयीस्करपणे 'मौन' बाळगून असल्याने, हे सर्व 'अर्थपूर्ण' अभयारण्यातूनच सुरू असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

रस्त्यांच्या बाजूला 'शोल्डर' किंवा 'बरम' भरण्यासाठी दर्जेदार मुरुमाची गरज असते. या कामासाठी लागणारा मुरूम अधिकृत खदानीतून आणणे बंधनकारक असताना, कंपनीने रातोरात स्थानिक ठिकाणांहून अवैध उत्खनन करून आपली तिजोरी भरण्याचे काम चालवले आहे. यामुळे केवळ जमिनीचे नुकसान होत नाहीये, तर शासनाचा लाखो रुपयांचा रॉयल्टी महसूलही बुडत आहे.





रात्रीच्या वेळी हायवा ट्रक्सच्या वाढलेल्या वर्दळीमुळे आणि मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या धूळ प्रदूषणामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. शेतशिवारातील रस्ते या जड वाहनांमुळे खचले असून, शेतीचेही नुकसान होत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ चे काम हाती घेतलेल्या निखिल कन्स्ट्रक्शनने किती ब्रास मुरमाची रॉयल्टी काढली याबाबतची सविस्तर चौकशी करून निखिल कन्स्ट्रक्शन दोषी आढळल्यास कंपनीवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी, कारवाई न केल्यास स्थानिक व परिसरातील नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# नारायण संगेवार पुरस्काराने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)** – प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील सरपंच नारायण लक्ष्मण संगेवार यांना सोयाबीन लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाधन योद्धा पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराद्वारे संतुलित पीक पोषण, वैज्ञानिक शेती पद्धती आणि कार्यक्षम अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून उल्लेखनीय उत्पादनक्षमता साध्य करणाऱ्या प्रगत शेतकऱ्यांचा गौरव केला जातो. हा सन्मान पीक उत्पादनक्षमता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक पीक पोषण उपाययोजनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करतो. कार्यक्रमात बोलताना पुरस्कार विजेते नारायण लक्ष्मण संगेवार यांनी आपले मत मांडले.

# प्राचार्य डॉ. गणेश जोशी यांना 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६' जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)** – अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्यावतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६' यावर्षी एमजीएम पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश मुरलीधर जोशी यांना जाहीर करण्यात आला आहे.

फुले - आंबेडकरी चळवळीतील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैचारिक तसेच कलात्मक क्षेत्रात डॉ. जोशी यांनी निःस्वार्थ भावनेने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत पुरस्कार निवड समितीने त्यांच्या नावाची घोषणा केली आहे.



या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचित्र व सन्मानपत्र (प्रमाणपत्र) असे असून, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता नवीन नांदेड येथील सिडको परिसरात आयोजित करण्यात आलेल्या विशेष सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे

# महात्मा फुले हायस्कूलच्या उपमुख्याध्यापकपदी डॉ. गरड

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी हायस्कूल सिडको, नवीन नांदेड येथे पर्यवेक्षक म्हणून कार्यरत असलेले डॉ. अण्णा गरड यांची संस्थेच्या वतीने महात्मा फुले स्कूल बाबानगर विजयनगर नांदेड येथे उपमुख्याध्यापक पदी पदोन्नती देण्यात आली आहे.



डॉ. अण्णा गरड हे मागील ३० वर्षापासून इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नवीन नांदेड येथे भूगोल विषयाचे अध्यापन कार्य करीत असून, त्यांची इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नवीन नांदेड येथे सेवाज्येष्ठतेनुसार पर्यवेक्षकपदी निवड करण्यात आली होती.

# 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी' योजना म्हणजे कर्जमुक्ती नव्हे, तर कर्जवसुली –ॲड. शिवाजी कदम

**भोकर (प्रतिनिधी)** –राज्य सरकारने राज्यातील शेतकऱ्यांसाठी घोषित केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना' ही शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्या अडचणी वाढवणारी ठरत आहे. या योजनेतील जाचक अटी व शर्ती पाहता ही योजना कर्जमाफी नसून एक प्रकारे कर्जवसुलीच आहे, असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) भोकर तालुक्याच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात तालुकाध्यक्ष ॲड. शिवाजी कदम नागापूरकर यांच्या नेतृत्वाखाली भोकरचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात नमूद केल्यानुसार, सरकारने सन २०१९ ते २०२६ दरम्यान शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला होता, त्यांना यंदाच्या योजनेत केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच कर्जमाफी मिळणार आहे. २०१९ मध्ये राज्यातील सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांनी लाभ घेतला होता, म्हणजेच या सर्व ३३ लाख शेतकऱ्यांना यंदाच्या योजनेचा पूर्ण लाभ मिळणार नाही.

तसेच ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाखांपेक्षा अधिक आहे त्यांनी एकवेळ तडजोड अंतर्गत २ लाखांवरील उर्वरित रक्कम आधी भरली, तरच त्यांना २ लाखांच्या कर्जमाफीचा लाभ दिला जाईल, अशी अट ठेवण्यात आली आहे. ५० हजारांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्यांनाही आधी उर्वरित रक्कम भरण्याची सक्ती केली जात आहे, जी अत्यंत अन्यायकारक आहे.

योजनेच्या अटीनुसार ज्या शेतकऱ्यांनी सन २०२२-२३, २०२३-२४, किंवा २०२४-२५ यांपैकी कोणत्याही दोन वर्षांतील पीक कर्जाची वेळेत परतफेड केली असेल, त्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. मात्र, हा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्याने सन २०२५-२६ आणि २०२६-२७ चे पीककर्ज भरलेले असणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा होतो की, प्रोत्साहनपर ५० हजार मिळवण्यासाठी शेतकऱ्याला सलग चार वर्षांचे कर्ज भरणे बंधनकारक केले आहे, जे गरीब शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर आहे.

# पी.एम. किसानच्या पुढील हप्त्यासाठी ३० जूनपूर्वी ई-केवायसी करा

**उमरी (प्रतिनिधी)**– प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व शेतकरी लाभार्थ्यांनी चालू वर्षाची वार्षिक ई-केवायसी प्रक्रिया दि. ३० जून २०२६ पूर्वी पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे शिवाजी मिरासे तालुका कृषी अधिकारी, उमरी यांनी सांगितले आहे.



केंद्र शासनामार्फत दि. २४ फेब्रुवारी २०१९ पासून राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६ रुपये इतकी आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने दिली जाते.

पी.एम. किसान योजनेअंतर्गत पात्र व जिवंत लाभार्थ्यांनाच लाभ मिळावा तसेच लाभार्थ्यांचे सातत्यपूर्ण प्रमाणीकरण सुनिश्चित करण्यासाठी केंद्र शासनाने सर्व लाभार्थ्यांसाठी वार्षिक ई-केवायसी प्रमाणिकरण अनिवार्य केले आहे.

# सौ. वैशाली पावडे यांना पदोन्नती

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी हायस्कूल, सिडको, नवीन नांदेड येथे उपमुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या सौ. वैशाली देशमुख-पावडे यांची संस्थेच्यावतीने मुख्याध्यापकपदी पदोन्नती देण्यात आली आहे.



सौ. वैशाली देशमुख-पावडे ह्या संस्कृत विषयाच्या अध्यापिका असून त्यांनी यापूर्वी सावित्रीबाई फुले हायस्कूल बाबानगर नांदेड येथे तीस वर्षापासून संस्कृत विषयाचे उत्कृष्ट अध्यापन केले आहे. त्यानंतर त्यांची सेवा ज्येष्ठतेनुसार महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर विजयनगर येथे पर्यवेक्षक यापदी पदोन्नती करण्यात आली.

# डीआरएम कामले यांनी नांदेड-मनमाड विभागातील 'ओएमएस' रनचे केले निरीक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी नांदेड-मनमाड विभागातील ऑसिलेशन मॉनिटरिंग सिस्टीम रनचे निरीक्षण केले. ट्रॅकची गुणवत्ता, राइडिंग कम्फर्ट आणि रेल्वे सुरक्षिततेचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या या निरीक्षणादरम्यान त्यांनी मार्गावरील छत्रपती संभाजीनगर, मनमाड, नागरसोल आणि रोटेगाव स्थानकांवरील प्रवासी सुविधा, कर्मचारी कल्याण आणि सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली.



छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर डीआरएम यांनी प्रवासी सुविधा, स्वच्छता व्यवस्था, देखभाल कामे आणि स्थानकाच्या एकूण कार्यपद्धतीचा आढावा घेतला. प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

मनमाड येथे डीआरएम यांनी रनिंग रूम आणि टीटीई विश्रांतीगृहाची पाहणी केली. रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या निवास व इतर सुविधांची तपासणी करून स्वच्छता, देखभाल आणि सुविधा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. रेल्वेच्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी उपलब्ध सुविधांचा दर्जा उंचावण्यावर त्यांनी भर दिला. नागरसोल येथे स्थानक इमारत, सर्क्युलेटिंग एरिया, आरपीएफ बॅरॅक तसेच सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करण्यात आली. यावेळी विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेऊन कामे गुणवत्तापूर्ण व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. तसेच प्रवासी सुविधांची देखभाल आणि स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला.

# वेठबिगार मजुरी निर्मूलनासाठी केंद्र शासनाची सुधारित 'एसओपी' लागू

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात वेठबिगार मजुरी पद्धती निर्मूलन अधिनियम १९७६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने १४ मे २०२६ रोजी जारी केलेल्या सुधारीत मानक कार्यपद्धतीची व्यापक प्रसिद्धी व अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

वेठबिगार मजुरी पद्धती निर्मूलन अधिनियम १९७६ नुसार वेठबिगार मजुरी पद्धत पूर्णपणे बेकायदेशीर घोषित करण्यात आली असून, अशा पद्धतीतून निर्माण झालेली सर्व प्रकारची बंधने व कर्जे समाप्त मानली जातात. एखाद्या व्यक्तीकडून कर्ज, सामाजिक बंधने, जातीय दबाव, परंपरा किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव सक्तीने अथवा विनामोबदला काम करून घेणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे.

केंद्र शासनाच्या सुधारीत 'एसओपी' मध्ये वेठबिगार मजुरांची ओळख, तत्काळ सुटका, संरक्षण, पुनर्वसन, आर्थिक सहाय्य, कायदेशीर कारवाई तसेच विविध विभागांमधील समन्वय याबाबत स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. वेठबिगार मजुरांची ओळख पटताच त्यांची तात्काळ मुक्तता, सुरक्षित निवारा, अन्न, वैद्यकीय मदत, कायदेशीर सहाय्य व पुनर्वसनाच्या उपाययोजना त्वरित राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वेठबिगार मजुरी निर्मूलनाच्या कार्यात कामगार विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून विभागामार्फत विविध क्षेत्रांमध्ये विशेष पाहणी व जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. वीटभट्ट्या, ऊसतोडणी, बांधकाम क्षेत्र, खाणकाम, कृषी क्षेत्र तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांची परिस्थिती नियमितपणे तपासली जात आहे.

कामगार विभागामार्फत संबंधित अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व नागरिक यांना वेठबिगार मजुरीची लक्षणे, कायदेशीर तरतुदी व तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच संशयित प्रकरणांची माहिती संबंधित जिल्हा प्रशासन, महसूल व पोलीस विभागास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महसूल विभागामार्फत जिल्हा व तालुका स्तरावरील दक्षता समित्यांचे समन्वयन, बचाव मोहिमांचे नेतृत्व व पुनर्वसन प्रक्रियेवर देखरेख केली जाते. पोलीस विभागामार्फत गुन्ह्यांची नोंद, तपास व दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाते. महिला व बाल विकास विभाग, तसेच इतर संबंधित यंत्रणा पुनर्वसन व कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी समन्वयाने कार्य करतात.

सुधारीत एसओपी नुसार जिल्हा व उपविभागीय स्तरावरील दक्षता समित्यांना अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. ग्रामपंचायत व तालुका स्तरावर जनजागृती कार्यशाळा घेऊन वेठबिगार मजुरीची ओळख व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती दिली जाणार आहे.

नागरिकांनी आपल्या परिसरात कोणत्याही व्यक्तीकडून सक्तीने काम करून घेतले जात असल्याचे, कर्जाच्या मोबदल्यात मजुरी करण्यास भाग पाडले जात असल्याचे किंवा वेठबिगार मजुरीचे कोणतेही स्वरूप आढळून आल्यास त्याची माहिती तात्काळ कामगार विभाग, तहसील कार्यालय किंवा पोलीस प्रशासनास द्यावी.

वेठबिगार मजुरीमुक्त समाज निर्माण करण्यासाठी नागरिक, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था व सर्व शासकीय विभागांनी सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने नांदेड जिल्ह्यातील सहायक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांचेकडून करण्यात आले आहे.

# चंदेरी

## अभिनेत्री जॅकी श्रॉफ यांची विशेष मुलाखत

# अशक्य काहीच नसतं, जे काम मिळतंय त्यासाठी देवाचे आभार माना!

**वाढती उष्णता, तोडली जाणारी झाडे आणि बदलणारे हवामान या सगळ्यात जॅकी श्रॉफ आजही त्याच संदेशावर ठाम आहेत, जो संदेश ते वर्षानुवर्षे देत आले आहेत : 'झाडे लावा आणि पृथ्वी वाचवा.' त्यांच्यासाठी पर्यावरण हा एक ट्रेंडिंग विषय नसून, भावी पिढ्यांप्रती असलेली एक जबाबदारी आहे. त्यांचा विश्वास आहे की, जर सर्वत्र हिरवळ असेल, तर समृद्धी आपोआप येईल आणि मुलांसाठी यापेक्षा मोठा वारसा असू शकत नाही. जॅकी यांनी त्यांच्या 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो: एलियन्स' या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने पत्रकारांशी संवाद साधला. त्यांनी निसर्ग, मुले आणि जीवनाबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला...**



### निसर्गाला जे द्याल, तेच परत मिळेल...

जर माझ्याकडे महाशक्ती असती, तर मी प्रयत्न केला असता की कोणीही उपाशी झोपू नये. मी संपूर्ण पृथ्वी हिरवळीने भरून टाकली असती. पृथ्वीवर खूप क्रूरता केली जात आहे. लोक म्हणतात, की खूप उकाडा जाणवत आहे. पण त्यापासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही काय करत आहात हे सर्वात महत्त्वाचे आहे. जर सर्वत्र हिरवळ असेल, तर सर्वत्र समृद्धी असेल. झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करणे ही आपली जबाबदारी आहे, कारण आपण निसर्गाला जे देतो, तेच आपल्याला परत मिळते. मुलांनाही हिरवळ पसरवण्यासाठी प्रेरित करा.

### मुलांसाठी काय मागे ठेवता हे महत्त्वाचे...

जॅकी म्हणतात, की मी सर्वांना सांगतो की आयुष्यात आनंदी राहा. काम आणि शरीराच्या काळजीसोबत लोकांचा आदर करा. योगाभ्यास करा आणि निरोगी राहा. या गोष्टी तुमच्या मुलांना शिकवा. मुलांची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण तेच आपले भविष्य आहेत. याउलट, लोक स्वतःची काळजी घेण्यात इतके व्यस्त असतात की ते आपल्या मुलांकडे कमी लक्ष देतात. ज्या दिवशी तुम्ही त्यांच्याबद्दल विचार करायला लागाल, त्या दिवशी तुम्ही निसर्गावरही प्रेम करायला लागाल.

### लोक 40 वर्षांपासून माझ्यावर विश्वास ठेवतात...

जॅकी म्हणाले, की आयुष्यात कठीण गोष्टी कोणत्याच नसतात. जर तुम्हाला काम मिळत असेल तर त्यासाठी देवाचे आभार माना. मला आधीही काम मिळत होते आणि आजही मिळत आहे. ४० वर्षे उलटून गेली आहेत. लोक अजूनही माझ्यावर विश्वास ठेवतात आणि मला पसंत करतात. त्यासाठी मी देवाचे आभार मानतो. काही आया आपल्या मुलांना सांगतात, की हे टायगर श्रॉफचे वडील आहेत. मलाही हे ऐकायला आवडते. कारण त्यामुळे मला एक नाव मिळाले. प्रत्येक पालक आपल्या मुलाच्या प्रगतीने आनंदी असतो. मी देवाकडे कधीच काही मागितले नाही; त्याला जे योग्य वाटले ते त्याने मला दिले आणि मी ते स्वीकारत राहिलो.

### मोठ्या माणसांनी मुलांचे ऐकले पाहिजे...

मला सेटवर मुलांसोबत वेळ घालवायला खूप मजा आली. सेटवर आठ- नऊ मुले होती. प्रत्येकाच्या घरून जेवण येत असे आणि मलाही त्यात वाटा मिळत असे. आम्ही मोकळ्या वेळेत खेळायचो आणि जेव्हा मी शूटिंगदरम्यान त्यांना बोलवायचो, तेव्हा ते सर्व योद्ध्यांसारखे यायचे. मी प्रत्येक मुलाला माझा मुलगा टायगर मानतो. दिग्दर्शकाने (मनीष सैनी) मला मुलासारखे वागवले. त्यांनी मला ज्या प्रकारे हाताळले, ते 'हिरो'मध्ये सुभाष घई यांनी मला जसे हाताळले होते, अगदी तसेच होते. माझा विश्वास आहे की मोठ्या माणसांनीही मुलांचे ऐकले पाहिजे. त्यांची त्यांच्या आजी-आजोबांशी मैत्री घट्ट करा. जर त्यांना आजी- आजोबा नसतील, तर त्यांना तुमच्या आई-वडिलांबद्दलच्या गोष्टी सांगा. असे बरेच लोक आहेत ज्यांच्या घरी त्यांच्या आजी-आजोबांचा फोटोसुद्धा नसतो. तुमच्या हाता- पायांमध्ये नेहमी ताकद असली पाहिजे, जेणेकरून तुमचा नातू म्हणू शकेल, माझे आजोबा सुपरहिरो आहेत.

### मुलांना जेवताना फोन देऊ नका...

मुलांना जेवताना कधीही फोन देऊ नये. समजा ते फोनवर कार्टून बघत असताना अचानक हसले, तर अन्न त्यांच्या घशात अडकून अपघात होऊ शकतो. त्यांना सांगा की त्यांनी जेवण काळजीपूर्वक आणि व्यवस्थित चावून खावे. मुलांमध्ये चांगल्या सवयी रुजवणे ही पालकांची जबाबदारी आहे.



## करिश्मा कपूरची विशेष मुलाखत

# ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे वाढल्या संधी, प्रत्येक वयाच्या कलाकारासाठी भूमिका लिहिल्या जाताहेत...

'अंदाज अपना अपना', 'साजन चले ससुराल' आणि 'जुडवा' यांसारख्या चित्रपटांमधून ९० च्या दशकात चाहत्यांचे मनोरंजन करणारी करिश्मा कपूर आता मोठ्या पडद्यापासून दूर गेली असली तरी, ती प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय आहे. नुकतेच करिश्माने तिच्या फिटनेस, करिअर आणि तिच्या 'ब्राऊन' या वेब सीरिजबद्दल संवाद साधला...

**प्रश्न : जेव्हा कधी तुझा उल्लेख होतो, तेव्हा लोकांना तुझ्या फिटनेसच्या रहस्यांबद्दल जाणून घ्यायला सर्वात जास्त आवडते. त्याबद्दल थोडे सांग...**

» **करिश्मा :** खरं तर मी फार काही करत नाही आणि सर्वांना माहीत आहे की माझ्या कुटुंबातील प्रत्येकजण खाण्याचा शौकीन आहे. मी सुद्धा खूप खादाड आहे. पण माझा विश्वास आहे की आपण त्याच वेळी काहीतरी करत राहिले पाहिजे. आपण व्यायाम केला पाहिजे. मी जिममध्ये जाणारी मोठी व्यक्ती नाही, पण मी योगा, चालणे आणि धावणे यांसारख्या इतर गोष्टी करते. मी ते आधीपासूनच करत आहे. माझा विश्वास आहे की आपण प्रत्येक गोष्टीचा आनंद घेतला पाहिजे. गोड पदार्थही खाल्ले पाहिजेत, पण प्रमाणात. आपण अति-डाएट करू नये. म्हणून, मर्यादेत राहून सर्व काही ठीक आहे. आपण व्यायामही करत राहिले पाहिजे.

**प्रश्न : पूर्वी, नायिका लग्न आणि मुलांनंतर ब्रेक घ्यायच्या. पण आता त्या आपलं करिअर सुरू ठेवतात...**

» **करिश्मा :** डिजिटल प्लॅटफॉर्मच्या आगमनापासून कलाकारांना त्यांच्या वयाची पर्वा न करता सर्व प्रकारच्या भूमिका मिळत आहेत. तुम्ही तिशीत असाल, चाळीशीत असाल किंवा साठीत असाल, कलाकारांना अधिक सशक्त भूमिका मिळत आहेत, ही एक चांगली गोष्ट आहे.

**प्रश्न : आज नायिकांसाठी पूर्वीपेक्षा जास्त संधी आहेत का?**

» **करिश्मा :** मला वाटतं की अशा संधी प्रत्येक दशकात, प्रत्येक युगात अस्तित्वात असतात. 'मदर इंडिया'च्या काळापासून ते त्यानंतरच्या काळापर्यंत लिस्ट खूप मोठी आहे. माझ्याबद्दल बोलायचं झालं तर, मला संधी मिळाल्या आणि आजही ज्या चित्रपटांची चर्चा होते, त्या चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. 'बीवी नं. १', 'शक्ती', 'फिझा', 'जुबैदा', 'राजा हिंदुस्तानी' किंवा 'दिल तो पागल है' असो, या सर्व चित्रपटांमधील नायिका उत्कृष्ट आणि सशक्त होत्या. त्या आपापल्या पातळीवर आपली ताकद दाखवत होत्या. पण आता, ओटीटी प्लॅटफॉर्मच्या आगमनाने संधी आणखी विस्तारल्या आहेत. सर्व वयोगटातील कलाकारांसाठी भूमिका उपलब्ध आहेत, ही खरोखरच एक उल्लेखनीय गोष्ट आहे. त्यामुळे, त्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, कलाकारांसाठी हा खूप चांगला काळ आहे.



**प्रश्न : म्हणूनच का आता सर्व वयोगटांसाठी सोलो लीड भूमिका असलेले चित्रपट मिळत आहेत?**

» **करिश्मा :** मला वाटतं की आजकाल सर्वच कलाकार, मग ते अभिनेते असोत वा अभिनेत्री, भाग्यवान आहेत. मग ते लहान मूल असो वा आजी, त्यांनाही सोलो लीड भूमिका मिळू शकते. हा कलाकार आणि प्रेक्षकांसाठी खूप सर्जनशील काळ आहे, कारण त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे चित्रपट पाहण्याची संधी मिळत आहे.

**प्रश्न : आम्हाला तुमच्या नवीन वेब सीरिज 'ब्राऊन' बद्दल थोडे सांग.**

» **करिश्मा :** 'ब्राऊन' ही एक सायकॉलॉजिकल थ्रिलर आहे, पण ती एक मानवी कथा देखील आहे. ही रीटा ब्राऊन आणि इतर पात्रांबद्दल आहे, आणि ही अजिबात एकसुरी कथा नाही. रीटा ब्राऊन कोण आहे आणि ती कोणत्या परिस्थितीतून जात आहे, हे यात दाखवले आहे. खुनाच्या प्रकरणाचा तपास करत असताना ती स्वतःमध्येही बदल घडवत आहे. दुसरं म्हणजे या मालिकेने मला खूप आव्हान दिलं. यात खूप काही वेगळं होतं. म्हणूनच मी हा प्रोजेक्ट स्वीकारला.

**प्रश्न : तुला चित्रपटसृष्टीत खूप अनुभव आहे. आता तू ओटीटी प्रोजेक्ट्सवरही काम करत आहेस. दोन्ही प्लॅटफॉर्मवर काम करताना तुला काय फरक जाणवला?**

» **करिश्मा :** पूर्वी आम्ही अधिक उत्साहाने काम करायचो. तेव्हाही कथा असायच्या, पण बाउंड स्क्रिप्ट्स नसायच्या. याचा अर्थ असा की, 'उद्या माझा हा सीन आहे, म्हणून आपण त्यावर आधारित वर्कशॉप्स करूया,' असं कधीच व्हायचं नाही. असं काहीच घडायचं नाही. आम्ही सेटवर जायचो, संवाद पाठ करायचो आणि काम करायचो. तो एक खूप वेगळा काळ होता, एक वेगळं युग होतं. आता, सगळं काही पूर्वनियोजित असतं; आम्हाला चांगल्या स्क्रिप्ट्स मिळतात, आम्ही त्या वाचू शकतो, अनेक वर्कशॉप्स असतात आणि आम्हाला सर्व कलाकारांशी संवाद साधायला मिळतो. त्यामुळे हा एक खूप वेगळा आणि मजेशीर अनुभव आहे. प्लॅटफॉर्मच्या बाबतीत बोलायचं झालं तर, मला दोघांची तुलना करायची नाही, कारण तेव्हा ज्या प्रकारचे चित्रपट बनत होते तो एक वेगळा काळ होता आणि आता वातावरणही वेगळे आहे, त्यामुळे आपल्याला काळाबरोबर पुढे जायला हवे.

**प्रश्न : कोलकात्यात शूटिंगचा अनुभव कसा होता?**

» **करिश्मा :** मला कोलकाता खूप आवडतं. मी तिथे आधीही गेले आहे, पण यावेळी माझा वेळ खूप छान गेला. आम्ही सर्व खऱ्या ठिकाणी शूटिंग केलं. आम्ही कोलकात्यात पूर्ण दोन महिने होतो, त्यामुळे आम्ही चायनाटाऊन असो किंवा बो बॅरॅक्स, मे आणि जूनच्या उन्हात खऱ्या ठिकाणी शूटिंग केलं. त्यामुळे तो एक खूप वेगळा अनुभव होता, पण खूप मजा आली.

# खुद को कर बुलंद इतना...

## अहाना कुमराने सांगितला बॉलीवूडमधील संघर्ष



**रंगभूमीवरील सक्ती, निर्णयांची किंमत आणि इंडस्ट्रीतील राजकारण यात स्वतःचे स्थान निर्माण करणारी अहाना कुमरा जितकी स्पष्टवक्ती आहे, तितकेच तिचे विचारही निर्मळ आहेत. नसीरुद्दीन शाह यांच्याकडून शिकलेल्या धड्यांनी तिला आत्मनिर्भर बनवले, तर लखनौची संस्कृती आणि चिकाटी आजही तिच्या कामात दिसून येते. या विशेष मुलाखतीत, अहाना कुमराने आपला संघर्ष, जोखीम पत्करण्याचे धाडस आणि एक कलाकार म्हणून स्वतःमध्ये सतत होत असलेल्या सुधारणांबद्दल मनमोकळेपणाने सांगितले...**

### शहराची शिकवण अन् मूल्यांसह मुंबईत काम करतेय...

अहाना सांगते, की लखनौने मला संस्कृती आणि दृढनिश्चय दोन्ही दिले आहेत. तुम्ही म्हणाल तर, मुंबईला गेल्यावर तुम्ही तुमचे संस्कार विसरून जाता (हसते). तथापि, या शहराने मला निश्चितपणे एक दृढनिश्चय दिला आहे, कारण जेव्हा तुम्ही अशा शहरांमधून येता जिथे तुम्हाला तुमच्या शहराचा अभिमान बाळगावा लागतो, तेव्हा एक जबाबदारीची भावना निर्माण होते. मी आता लखनौला राहत नाही, पण वर्षातून एकदा- दोनदा भेट देते, कधी जेवणासाठी तर कधी एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी. लखनौमध्ये पोहोचल्याबरोबरच मला वाटते की मला शहराचा अभिमान बाळगायचा आहे. या शहराने मला शिकवलेल्या शिकवणी आणि मूल्यांसह मी मुंबईत काम करत आहे, असे ती म्हणाली.



### नाटकामुळे लागलेली सवय बनली ओळख

अहाना म्हणाली, की माझं साड्यांवर खूप प्रेम आहे. मी मकरंद देशपांडे यांच्यासोबत १५ वर्षांपासून एक नाटक करत आहे. आम्ही भाग्यवान आहोत की आम्हाला लखनौमध्ये 'सर, सर, सरला' हे नाटक अनेक वेळा सादर करण्याची संधी मिळाली. खरं तर, मी त्या नाटकामुळेच साड्या घालायला सुरुवात केली. त्यामुळेच माझ्या मनात साड्यांबद्दलची आवड निर्माण झाली. मला आठवतंय, जेव्हा माझा पहिला चित्रपट प्रदर्शित झाला, तेव्हा मला स्टायलिंगबद्दल काहीच माहिती नव्हती. मी मोठ्या नामांकित दुकानांमध्ये जाऊन स्टायलिंगसाठी साड्या विकत घ्यायचे. मी १४ साड्या अमेरिकेत घेऊन गेले होते. तिथे मी सुमारे सात- आठ चित्रपट महोत्सवांमध्ये भाग घेतला. माझा विश्वास होता की माझा चित्रपट भारतीय असल्यामुळे मी भारतीय वेशातच दिसले पाहिजे. मी प्रत्येक प्रीमियरला फक्त साड्याच घालायचे, मग ते लॉस एंजेलिस, वॉशिंग्टन, ऑस्टिन (टेक्सास) किंवा इतर कुठेही असो. एवढ्या मोठ्या साड्या सोबत बाळगत असल्याने इमिग्रेशनमध्ये थांबवण्यात आलं होतं, त्यांना वाटलं, की मी नक्की अभिनेत्री आहे, की साड्या विकण्यासाठी चालली आहे. त्यांना पटवून द्यावं लागलं, की मी अभिनेत्री आहे आणि प्रीमियरसाठी चालले आहे. मी लखनौमध्ये वाढले आणि माझे वडील बनारसचे आहेत. माझ्या आईला साड्यांची खूप आवड आहे. त्यामुळे आम्ही बनारसला जाऊन खूप साऱ्या साड्या खरेदी करतो. आम्ही सण आणि समारंभांमध्ये साड्या भेट देतो. खरं सांगायचं तर, आमच्या घरात साड्यांची खूप ये-जा असते.

### मी माझ्या निर्णयांची मोठी किंमत मोजली...

अहाना सांगते, की मी नेहमीच म्हणते की मी घेतलेल्या निर्णयांची संपूर्ण जबाबदारी मी घेते. लोकांच्या वर्षानुवर्षे लक्षात राहतील अशा भूमिका साकारून मला ही जबाबदारी पार पाडावी लागते. मी त्या भूमिका का केल्या याचा मला नंतर विचार करण्याची गरज नाही. या भूमिकांसाठी नेहमीच मोठी किंमत मोजावी लागते. जर तुम्ही आमच्यासारख्या व्यवसायात जोखीम पत्करत नसाल, तर इथे येऊन काहीच अर्थ नाही. तुम्ही नऊ ते पाचची नोकरी करू शकता. मोठे अभिनेते जोखीम पत्करतात. ज्यांनी जोखीम पत्करली नाही, त्यांच्या कारकिर्दीला लवकरच उतरती कळा लागली. मी माझ्या निर्णयांची मोठी किंमत मोजली आहे. मी अनेक लोकांकडून शिव्या ऐकल्या आहेत. लोकांनी माझ्यासोबत पुन्हा काम करणार नाही असेही म्हटलेले मी ऐकले आहे. मी त्यांना सांगितले, तुम्ही एकटे नाही आहात. तुम्ही माझ्यासोबत काम केले नाही तरी मला काम मिळतच राहील. मी इतकी मोठी झाले आहे की मला कोणाच्याही धमक्यांची गरज नाही. मी आता निर्मितीसुद्धा करत आहे. तुम्ही मला थांबवू शकत नाही. तो एक शेर आहे : खुदी को कर बुलंद इतना कि हर तक़दीर से पहले, ख़ुदा बंदे से ख़ुद पूछे, बता तेरी रज़ा क्या है।

### नसीरुद्दीन शाह म्हणाले, ही तुझी जबाबदारी!

नाट्यक्षेत्रात तुम्ही सर्वात आधी शिस्त आणि एकाग्रता शिकता. तुम्हाला जे सांगितलं जातं ते करावंच लागतं आणि त्यासाठी तुम्हाला पैसे मिळत नाहीत. चित्रपटांप्रमाणे, तुमच्या आजूबाजूला १० लोक नसतात. मला आठवतंय, जेव्हा मी माझा पहिला शो 'मॉटली' केला, तेव्हा मी माझे कपडे स्वतःच बॅकस्टेजवर लावले होते. आमच्या वस्तू आणि बदलण्याचे कपडे तपासले जातात, आणि मी ते नीट केलं नाही. त्यासाठी नसीरुद्दीन शाह सरांनी मला खडसावले. ते म्हणाले, 'तुला वाटतं का की इथे कोणी तुझं काम करेल? शांतपणे जाऊन तुझे सगळे पोशाख तपास. बघ कुठे काय ठेवलं आहे.' रंगमंचावरून परत आल्यावर आणि पुढच्या दृश्यासाठी तयार होताना प्रत्येक गोष्ट कुठे आहे हे माहीत असणं ही तुमची जबाबदारी आहे. आम्ही तर ड्रेस रिहर्सलसुद्धा करायचो, ज्यात ३० सेकंदात ड्रेसची झिप कशी उघडायची आणि नवीन ड्रेसची झिप लावून पटकन रंगमंचावर कसे जायचे हे शिकवले जायचे. जर तुम्ही या गोष्टी शिकला नाहीत, तर ते जमणार नाही. नाट्यक्षेत्रात तुमच्याकडे



वेळ नसतो आणि दुसरे कोणीही तुमचे काम करणार नाही. तुम्हाला आत्मनिर्भर असावे लागते. माझ्या लक्षात आले आहे की आजकालचे अभिनेते उशिरा कामाला सुरुवात करतात आणि त्यांच्याभोवती १० जणांचा घोळका असतो. नाट्यक्षेत्रात तुम्हाला असे काही मिळत नाही. मी नेहमी म्हणते की ज्या कोणत्याही तरुण अभिनेत्याला अभिनय सुरू करायचा आहे, त्याने नक्कीच नाट्यक्षेत्रात काम केले पाहिजे.

# धरणांतील जलसाठ्यात घट, पाणी जपून वापरण्याचे निर्देश



**पुणे (प्रतिनिधी)–** राज्यातील अपुऱ्या पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर तसेच धरणातील उपलब्ध पाणीसाठा विचारात घेवून ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहे. बेकायदेशिर पाणी उपश्यावरही तातडीने कडक कारवाई करण्याच्या सुचना त्यांनी विभागाच्या आधिका-यांना दिल्या.

सिंचन भवनामध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत कृष्णा व गोदावरी लाभक्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या धरणांमधील पाणीसाठा, अगामी मान्सुनची परिस्थिती या संदर्भात महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीला कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हनमंत धुमाळ, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयवंत गवळी यांच्यासह मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

सद्य परिस्थितीत राज्यातील धरणांमधील एकुण उपयुक्त जलसाठा ३५७.५ टिएमसी (२५ टक्के) असून, तो गतवर्षीच्या तुलणेत कमी असल्याचे निदर्शनास आले. यावर्षीचे पर्जन्यमान अत्यल्प झाल्यामुळे धरणात पाणी आले नाही हे त्यामागील प्रमुख कारण आहे. विशेषत: पुणे विभागातील उपयुक्त जलसाठा गतवर्षीच्या तुलनेक कमी असल्याने परिस्थिती गांभिर्याने हाताळावी असे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिले.

पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगर क्षेत्रातील सुमारे ८५ लाख नागरीकांना ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याचे पाणी उपलब्ध राहण्यासाठी आवश्यक असलेले पाणी राखीव ठेवण्याच्या सुचना या बैठकीत मंत्र्यांनी प्राधान्याने दिल्या आहेत. मराठवाडा आणि कृष्णा महामंडळाच्या अंतर्गत येणारे सर्व धरणं, जलाशय व प्रमुख जलस्त्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा, त्यावर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा विचार करुन पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक राखीव कोटा निश्चित करण्याबाबतही बैठकीत जलसंपदा मंत्र्यानी सुचित केले. जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पाणीपुरवठा यंत्रणा यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून पाणी व्यवस्थापनाचा कृती आराखडा तातडीने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले.

नाशिक, अहिल्यानगर व मराठवाडा विभागातील जलसाठ्याचा आढावा घेताना नाशिक विभागात सध्या २६ टक्के तर मराठवाडा विभागात २८ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध असून, दोन्हीही विभागातील प्रकल्पांमध्ये अपेक्षित प्रमाणात पावसाची नोंद झालेली नाही. विशेषत: मराठवाडा आणि अहिल्यानगर विभागातपिण्याच्या पाण्याच्या गरजांना प्राधान्य देवून उपलब्ध जलसाठ्याचे काटेकारपणे नियोजन करण्याबातही गांभिर्याने कार्यवाही करण्यास आधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे.

नाशिक, अहिल्यानगर, पुणे, मराठवाडा विभागातील जलशयांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची नवीन आवक सुरु होईपर्यंत असलेल्या पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा. अगामी मान्सुनच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करतानाच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ग्रामीण व शहरी भागातील टंचाई निवारण आणि जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यावर भर देण्याबातही बैठकीत ठरविण्यात आले.

अहिल्यानगर जिल्ह्यासह गोदावरी खो-यातील विविध प्रकल्पांची स्थिती लक्षात घेता स्थानिक प्रशासन, जलसंपदा विभाग व पाणीपुरवठा यंत्रणांनी समन्वयाने काम करुन पाण्याचे नियोजन करावे, उपलब्ध जलसाठ्याचा वापर अत्यावश्यक गरजांसाठी करण्याबाबत जनजागृती करण्याचे आवाहनही मंत्री विखे पाटील यांनी या बैठकीत आधिकाऱ्यांना केले आहे.

## ओमानच्या किनाऱ्याजवळ 'विराट-१' जहाज बुडाले, अमेरिकी नौदलाकडून १४ भारतीय खलाशांची सुटका



**नवीदिल्ली(वृत्तसंस्था)–** आखाती प्रदेशात वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, आणखी एक मोठा सागरी अपघात घडला आहे. भारतीय जहाज 'एम एसव्ही विराट-१' ओमानच्या किनाऱ्याजवळ बुडाले. जहाजावर चौदा भारतीय नागरिक होते. अमेरिकी नौदलाच्या मदतीने सर्व भारतीयांना सुखरूप वाचवण्यात आले. जहाज बुडण्याचे कारण अद्याप अज्ञात आहे.

ओमानमधील भारतीय दूतावासाने रविवारी सांगितले की, त्यांना ओमानच्या किनाऱ्याजवळ १४ भारतीयांना घेऊन जाणाऱ्या जहाजाच्या अपघाताची माहिती मिळाली आहे. दूतावासाने सांगितले की, भारतीयांना सुखरूप वाचवण्यात आले असून बचावकार्य अजूनही सुरू आहे. दूतावासाने सांगितले की, जहाजाचे इंजिन निकामी झाले होते. दूतावासाने पुढे सांगितले की, भारतीय कर्मचाऱ्यांना लाईफ राफ्टमध्ये सुरक्षितपणे हलवण्यात आले.अमेरिकी नौदलाकडून मिळालेल्या माहितीनुसार, १४ भारतीयांना घेऊन जाणारे एमएसव्ही विराट-१ हे जहाज रास अल हद्दपासून अंदाजे ८० नॉटिकल मैल अंतरावर बुडत होते. बुडणाऱ्या जहाजाकडे भारतीय नौदलाची जहाजे पाठवण्यात आली. अमेरिकी नौदलाच्या पी८ विमानाने एक लाईफ राफ्ट खाली टाकला.

एमव्ही जबल अली ९ नावाचे दुसरे जहाजही बुडणाऱ्या जहाजाच्या दिशेने जात होते. एमव्ही जबल अलीकडून मिळालेल्या माहितीनुसार, सर्व १४ भारतीय लाईफ राफ्टमध्ये चढले होते. भारतीय दूतावासाने सांगितले की, सर्व भारतीय सुरक्षित आहेत, पण ओमानच्या अधिकाऱ्यांच्या समन्वयाने जवळच्या जहाजांच्या मदतीने बचावकार्य सुरू आहे.

## 'भीमाशंकर हेरिटेज वाडी' प्रकल्पामुळे परिसराचे परिवर्तन होणार –उपमुख्यमंत्री पवार

**मुंबई (प्रतिनिधी)–** भीमाशंकर परिसराचा धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या शाश्वत विकास साधण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या 'भीमा शंकर हेरिटेज वाडी' प्रकल्पाच्या जागेची पाहणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केली. यावेळी त्यांनी भाविकांसाठी प्रस्तावित विविध सुविधांचा सविस्तर आढावा घेतला.



भीमाशंकरच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्वाचा विचार करून विकास आणि संवर्धन यांचा समतोल राखत प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. 'भीमाशंकर हेरिटेज वाडी' प्रकल्पामुळे भीमाशंकरच्या सांस्कृतिक वारशाचे जतन होण्यास मदत होईल. तसेच ग्रामस्थांच्या जीवनमानात सुधारणा, भाविकांसाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध होणे आणि पर्यटन विकासाला चालना मिळून संपूर्ण परिसराचे सकारात्मक परिवर्तन घडेल, असा विश्वास सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

यानंतर त्यांनी श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन आरती केली. तसेच 'एल निनो' च्या संभाव्य संकटामुळे महाराष्ट्रातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, अशी प्रार्थनाही केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री आमदार दिलीप वळसे-पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार अतुल बेनके तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## रोहित पवारांच्या आंदोलनाचा तिसरा दिवस, प्रकृती खालावली

**मुंबई(प्रतिनिधी) –**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात रोहित पवार यांचे हे आंदोलन सुरू असून, दिवसेंदिवस या आंदोलनाची धार अधिक तीव्र होताना दिसत आहे. कर्जमाफीच्या जाचक अटी जोपर्यंत सरकार हटवत नाही तोपर्यंत मागे हटणार नाही, असा आक्रमक पवित्रा रोहित पवार यांनी घेतला आहे.

आजचा दिवस या आंदोलनासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. कारण आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी रोहित पवार यांची प्रकृती काहीशी खालावली असून, त्यांची साखरेची पातळी कमी झाली आहे. असे असूनही ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत.

**सरकारवर विश्वास नाही, लढा सुरूच राहणार : रोहित पवार**

आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी प्रकृती बिघडत असतानाच रोहित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सरकारला थेट इशारा दिला. सरकारकडून गेल्या तीन दिवसांपासून चर्चेच्या फेऱ्या सुरू असल्या तरी जोपर्यंत ठोस आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत सरकारवर विश्वास ठेवता येणार नाही, असे रोहित पवार म्हणाले.

रोहित पवार पुढे म्हणाले की, पवार कुटुंबातील असलो तरी सर्वसामान्यांसाठी यापूर्वीही अनेक आंदोलने केली आहेत. मोठ्या कुटुंबातील असलो तरी जबाबदारीनुसार सर्वसामान्यांसाठी लढा देण्याची शिकवण आम्हाला पवार साहेबांनी दिली आहे. जोपर्यंत जाचक अटी काढल्या जाणार नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, या भूमिकेवर मी ठाम आहे, असे देखील त्यांनी सांगितले.


### टी. सी. हरवली

माझी जुबेर निजामोद्दीन शेख या नावाची इयत्ता बारावी पासची टी. सी. देगलूर ते नांदेड या बस प्रवासात हरवली आहे. ज्यांना सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता–जुबेर निजामोद्द्दीन शेख मु. पो. शहापूर ता. देगलूर, जि नांदेड


## जून महिना अर्धा संपला तरीही उन्हाचे चटके कायम

**लातूर (प्रतिनिधी)–**जून महिना अर्धा संपत आला असताना लातूर जिल्ह्यात उन्हाचा कडाका कायम आहे. मान्सूनच्या आगमनाकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले असतानाही अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. पेरणी हंगाम तोंडावर आला असूनही पावसाने हुलकावणी दिल्याने शेतीची कामे रखडली आहेत.जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी खते व बियाणे खरेदी करून घरी आणून ठेवले आहेत. पाऊस पडताच पेरणीला सुरुवात करण्याची तयारी त्यांनी पूर्ण केली आहे. मात्र, जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने पेरणी करणे धोक्याचे ठरत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.सध्या दिवसभर प्रखर ऊन पडत असून उष्णतेमुळे नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. दुपारच्या वेळी रस्त्यांवर व बाजारपेठेत तुलनेने कमी वर्दळ दिसून येत आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची मागणीही वाढली आहे.



जळकोट तालुक्यासह परिसरात पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी लावली नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सुरुवातीला काही भागांमध्ये चांगला पाऊस पडला मात्र यानंतर पावसाने उघडीत दिली आहे. यावर्षी एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने शेतकरी धास्तावले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी खते व बियाण्यांची तयारी करून ठेवली असली तरी पावसाअभावी पेरण्या रखडल्या आहेत. वेळेत व पुरेसा पाऊस पडावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

जळकोट तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकरी कापूस पिकाची लागवड करतात. मात्र यावर्षी मृग नक्षत्रामध्ये म्हणावा तसा पाऊस पडला नाही. यामुळे कापसाची लागवड रखडली आहे. कापूस लागवड मृग नक्षत्रामध्ये होणे गरजेचे आहे. मृग नक्षत्रामध्ये कापसाची लागवड झाली. तरच कापसाचे उत्पादन चांगले मिळते अशी शेतकऱ्यांची धारणा आहे. यासोबतच मुगाची पेरणी देखील मृग नक्षत्रामध्येच व्हावी लागते. परंतु आता अर्धा मग नक्षत्र संपला तरीही कोणाचे चटके कायम आहेत, यामुळे यंदा कापसाला फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.कृषी तज्ज्ञांच्या मते, मान्सून सक्रिय झाल्यानंतर चांगला पाऊस झाल्यास पेरणीला वेग येईल. मात्र पावसाचा आणखी विलंब झाल्यास खरीप हंगामाच्या नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह व्यापारी आणि कृषी विभागाचे अधिकारीही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.दरम्यान, हवामानातील बदलत्या परिस्थितीमुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले असून लवकरात लवकर समाधानकारक पाऊस पडावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. खरीप हंगामाची सर्व तयारी पूर्ण असतानाही पावसाअभावी शेतकऱ्यांना प्रतीक्षाच करावी लागत आहे


**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, ता. हिमायतनगर यांचे कार्यालय**

प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.

अर्ज. क्र. /२०२६

### जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते की, अर्जदार नामे श्री/सी शामराव रंगराव आडे रा. मानसिंग तांडा ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म नोंदणी(सुधारणा) कायदा २०२३ मधील ११(२)व(३) अन्वये दि६/०५/२००६ रोजी नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदारश्री/सीशामरावरंगरावआडेरा.मानसिंगतांडाता. हिमायतनगर मुलगी/मुलगी नामे – समता रंगराव आडे कार्यालय मुख्यधिकारी नगर परिषद हिमायतनगर ता हिमायतनगरजि.नांदेडयेथेउपलब्ध–चाजन्मदि२४/०८/२००६ रोजीची नोंद ग्राम त्याअर्थी या जाहीरप्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते की, जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्धी पासून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक: ९/६ /२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन करण्यात येत आहे.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार हिमायतनगर



**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, ता. हिमायतनगर यांचे कार्यालय**

प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.

अर्ज. क्र. /२०२६

### जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि. अर्जदार नामे. श्री/सी गुरूप्रबाद देवराव धोंबाळे खडकी बा. ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील ११ (२) व (३) अन्वये २६/५/२०२६ रोजी नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार श्री गुरुप्रसाद देवराव धोंबाळे रा. खडकी बा. ता. हिमायतनगर मुलगी/मुलगी नामे –समीक्षा गुरुप्रसाद धोंबाळे रा. खडकी (बा) ता.हिमायतनगर चा जन्म दि. २२/११/२००९ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/मुख्यधिकारी नगर परीषद हिमायतनगर ता. हिमायतनगर जि.नांदेड येथे उपलब्ध आहे. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्धी पासून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल. आज दिनांक: ९/६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण करण्यात येत आहे.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार हिमायतनगर हिमायतनगर



**श्री संत बाळगीर महाराज शिक्षण संस्था कापसी (गुंफा) ता. लोहा, जि. नांदेड संचालित**

**श्री संत बाळगीर महाराज विद्यार्थी वसतिगृह कापसी (गुंफा) ता. लोहा, जि. नांदेड**

### प्रवेश देणे चालू आहे

सदरील शासन मान्य अनुदानीत मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहात शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे प्रवेश देणे चालू आहे. खालीलप्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | १४ टक्के |
| ३ | वि.जा.भ.ज./व्ही.जे./एन.टी. | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| | एकूण | १०० टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग ओबीसी | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासवर्ग ओपन | ५ टक्के |

वैशिष्ट्ये–भव्य व सुसज्ज इमारत, विनामूल्य भोजन व राहण्याची व्यवस्था, पिण्याचे शुद्ध पाणी, अभ्यासाकडे वैयक्तिक लक्ष, ग्रंथालयाची सोय, एकूण मान्य संख्येच्या २० टक्के जातनिहाय इतर मागासप्रवर्ग ओबीसी १५ टक्के, बिगर मागासवर्ग ओपन ५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. अनुशेषाप्रमाणे विद्यार्थी नाही मिळाल्यास इतरांचा विचार केला जाईल.

अध्यक्ष अधीक्षक

श्री संत बाळगीर महाराज विद्यार्थी वसतिगृह
कापसी (गुंफा) ता. लोहा, जि. नांदेड



### Change In Name

My Old Name is QAMER BEGUM. Now I am Changing as a New Name QAHMER BEGUM SHAIKH WALIMAHAMMAD .Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS. MADINA NAGAR NEAR MADINA MASJID ARDHAPUR TQ ARDHAPUR DIST NANDED MS 431704. MOB NO. 9730292434.



### Change In Name

My Old Name is BEBI PANDURANG WAGHMARE Now I am Changing as a New Name ANJALI DAYANAND TARU .Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. ADDRESS-R/O GOVIND NAGAR PANCHIL CHOWK NANDED-431605



### Change In Name

My Old Name is SALIMA BEGUM Now I am Changing as a New Name SALIMA BEGUM SHAIKH MUNIR. Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS. NEAR MADINA MASJID MADINA NAGAR ARDHAPUR TQ ARDHAPUR DIST NANDED MS 431704. MOB.NO.9765525409.



### Change In Name

My Old Name is MAHMAD MOHSIN SHAIKH USMAN which now I am changing as New Name MOHAMMAD MOHSIN SHAIKH USMAN SHAIKH Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - SHAIKH USMAN SHAIKH
Plot No.161 Aaysha Bag Degloor Naka
Nanded Itwara Nanded Post Itwara Nanded




### Change In Name

My Old Name is VALI MOHAMMED. Now I am Changing as a New Name SHAIKH WALIMAHAMMAD M.D.IBRAHIM. Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS H.NO.158, MADINA NAGAR NEAR MADINA MASJID ARDHAPUR TQ ARDHAPUR DIST NANDED MS 431704. MOB.NO.9730292434.



### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# लातूर जिल्ह्यात जुगार व मटका अड्ड्यांवर धाडी; १८ आरोपींविरुद्ध कारवाई, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** –लातूर जिल्ह्यात जुगार व मटका अड्ड्यांवर पोलिसांच्या एका पथकाने धाडी टाकल्या. या धाडीत ४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, १८ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यात काही ठिकाणी मटका-जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड येथून कारवाईसाठी पोलीस पथक पाठविले होते.

सदर पथकाने, दि. १३ जून रोजी औसा शहरातील कालन गल्लीतील अबुझर शेख याचे दुकानामध्ये चालू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत ४३ हजार १६० रुपयांची रोकड, ४९ हजार रुपयांचे ५ मोबाईल व ७० हजार ८०० रुपयांचे संगणक साहित्य, असा एकूण १ लाख ६२ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात एकूण ९ आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांचेविरुध्द औसा पोलीस ठाणे येथे गुरनं ३२५/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तद्नंतर मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून कासार शिरशी येथे सचिन बारच्या बाजूला प्रभाकर माने यांच्या दुकानात छापा टाकला असता या ठिकाणी तिर्रट नावाचा जुगार खेळताना ९ इसम मिळून आले. सदर इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ३२ हजार ९१० रुपयांची रोकड, ६५ हजार ८०० रुपयांचे ९ मोबाईल व १ लाख ४५ हजार रुपयांच्या ४ मोटारसायकली, असा एकूण २ लाख ४३ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यांचेविरुद्ध कासार शिरशी पोलीस ठाणे येथे गुरनं १३७/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या दोन्हीही कारवायांत पोलीस पथकाने एकूण ४ लाख ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, १८ आरोपीतांविरुद्ध गुन्हे नोंद केले आहेत. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला.

## री-नीट : परीक्षा केंद्राबाबत हलगर्जीपणा नको –शिवाजीराजे पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)** –३ मे रोजी पार पडलेल्या नीट परीक्षेतबाबत यशवंत महाविद्यालय उमरी किंवा संत गाडगेबाबा महाविद्यालय सोनखेड हा पत्ता पूर्ण न वाचता काही विद्यार्थी नांदेड व लोहा येथील समान नाव असलेल्या महाविद्यालयात पोहोचले. परंतु आपल्या सेंटरचा पत्ता वेगळा असल्याचे लक्षात आल्यावर ऐनवेळी त्यांना धावपळ करावी लागली होती तर काही विद्यार्थ्यांना परीक्षेला मुकावे सुध्दा लागले होते, त्यामुळे नीट सेंटरबाबत हलगर्जीपणा करु नये, असे आवाहन वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराजे पाटील यांनी केले आहे.

२१ जून रोजी री-नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी हॉलतिकीटावरील सेंटरचे नाव व पत्ता काळजीपूर्वक वाचावा. शक्य असल्यास स्वतः विद्यार्थ्यांनी किंवा पालकांनी आदल्या दिवशी सेंटर प्रत्यक्ष बघून यावे. परीक्षेच्या दिवशी रिपोर्टिंग टाईमच्या अगोदर केंद्रावर पोहोचावे. घरापासून केंद्रापर्यंतच्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन शिवाजीराजे पाटील यांनी केले आहे.

# मालटेकडी इस्लामपुरा अंडरग्राऊंड ब्रिजखाली अर्धनग्न जलसमाधी आंदोलनाचा इशारा



**नांदेड (प्रतिनिधी)** – मालटेकडी इस्लामपुरा परिसरातील रेल्वे अंडरग्राऊंड ब्रिजखाली झालेल्या पहिल्याच पावसाने कमरेइतके पाणी साचले होते. यामुळे चार ते पाच दिवस रहदारी बंद होती. या परिसरातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

यापूर्वीसुद्धा मनपा प्रशासनाला या अंडरब्रिजखाली पाणी साचू नये यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र आजपर्यंत कोणतीच दखल न घेतल्याने येत्या पंधरा दिवसात कार्यवाही न केल्यास अंडरब्रिजखाली साचलेल्या घाण पाण्यामध्ये अर्धनग्न जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा मनपा आयुक्त डोईफोडे यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

मागील दोन ते महिन्यांखाली याच परिसरामध्ये साचलेल्या पाण्यामध्ये पडून बालकाचा मृत्यू झाल्याची घटना ताजी आहे. याची पुनरावृत्ती होवू नये म्हणून मनपा प्रशासनाने या अंडरब्रिजखाली पावसाचे पाणी साचू नये यासाठी त्वरित कार्यवाही करून नागरिकांचा जीव धोक्यात जाण्यापासून वाचवावा अशी मागणी होत आहे. या ठिकाणी काही दुर्घटना घडल्यास त्यास सर्वस्वी मनपा प्रशासन जबाबदार राहील. उपाययोजना न केल्यास लोकश्रेय मित्र मंडळाचे नांदेड जिल्हाध्यक्ष रविकांत गायकवाड यांनी अर्धनग्न जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## नांदेड जिल्हास्तरीय 'अस्मिता लीग' सायकल स्पर्धा उत्साहात; ८० महिला खेळाडूंचा सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी)** –क्रीडा व युवक सेवांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेली जिल्हास्तरीय 'अस्मिता लीग' सायकल स्पर्धा रविवार, दि. १४ जून मोदी मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. दि. १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुलींसाठी आयोजित या स्पर्धेत जिल्हाभरातील विविध शाळा, क्रीडा संस्था व अकादमींच्या एकूण ८० महिला खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

या स्पर्धांचे आयोजन 'वर्ल्ड सायकल डे' निमित्त करण्यात आले होते. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी नांदेड जिल्हा सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष निखिल लातूरकर, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय बेतेवार, क्रीडा अधिकारी बालाजी शिरसीकर, नेहरू युवा केंद्र तथा मेरा भारतच्या अधिकारी अश्नी कनकटे, संतोष कुलकर्णी, नांदेड जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव प्रलोभ कुलकर्णी, नांदेड जिल्हा मॅच्युअर सायकलिंग असोसिएशनचे सचिव बन्टी सोनसळे, कांचन मस्के व उद्देश चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात अनुष्का जिंकलवाड हिने प्रथम क्रमांक पटकावला. जागृती गजभारे हिला द्वितीय, तर नियती पातेवार हिला तृतीय क्रमांक मिळाला. १७ वर्षांखालील गटात कोमल पवार हिने अव्वल स्थान मिळविले. सोनाक्षी सोनसळे हिने द्वितीय क्रमांक, तर मानवी कदम आणि तनक कोल्हे यांनी संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळविला. १९ वर्षांखालील गटात समीक्षा आढाव हिने प्रथम क्रमांक मिळवित विजेतेपद पटकावले. श्रद्धा जाधव हिला द्वितीय, तर नागेश्वरी चित्तारे हिला तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

या स्पर्धेत ऑक्सफर्ड द ग्लोबल स्कूल (पुयणी), नारायणा स्कूल विष्णुपुरी, टायगर करिअर मार्शल आर्ट कुंगफू-कराटे असोसिएशन, रुद्रा कराटे अकॅडमी तसेच नांदेड जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनच्या खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पंच म्हणून निलेश खराटे, गोविंद पांचाळ, वैभव अभोरे, वैभव दमकोंडवार, साई सोनसळे, विष्णू शिंदे, साधना चिकणे, राजू कोल्हे, चंद्रकांत आढाव, भंडारी सर आणि सुभाष लोखंडे यांनी काम पाहिले.





**नांदेड** – जालना-नांदेड समृद्धी महामार्ग बाधित शेतकऱ्यांची पुढील आंदोलनाची महत्त्वपूर्व बैठक बाभुळगाव फाटा तालुका नांदेड येथे पार पडली. या बैठकीस तुप्पा, काकांडी, बाभुळगाव, गुंडेगाव, पांगरी, विष्णुपुरी येथील शेतकऱ्यांचे प्रमुख समन्वयक दासराव हंबर्डे, बाबुजी परदेशी, शिवाजी कदम, अशोक मोरे, माजिद, संभाजी भालेराव, रामदास कदम, गजानन कदम, संतोष भालेराव, संतोष मस्के, साहेबराव कुरे, अमोल कदम आदींची उपस्थिती होती. **(छाया : सचिन डोंगळीकर)**

# जबरी चोरी करणारी टोळी गजाआड; दोन दुचाकींसह चांदीचे दागिने जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर व परिसरात जबरी चोऱ्या करून दुचाकी चोरीचे गुन्हे करणाऱ्या व पोलिसांपासून तोंड लपवत फिरणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड यांच्या पथकाने पकडले. त्यांच्याकडून चोरीच्या दोन दुचाकी गाड्या व चांदीचे दागिने जप्त केले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी वरिष्ठांच्या आदेशावरून पोउपनि साईनाथ पुयड व त्यांचे पथकातील अंमलदार यांना जिल्ह्यातील पाहिजे आणि फरार आरोपी यांना अटक करणे तसेच जबरी चोरी आणि दुचाकी चोरीच्या घटना उघड करण्याचे आदेशीत केले होते.

त्यावरून दिनांक १३ जून रोजी पोउपनि साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील अंमलदार हे नांदेड शहरातील लातूर फाटा परिसरात असताना त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे त्यांनी मामा चौक ते असर्जन जाणाऱ्या रोडवर सापळा रचून छापा मारला. यावेळी गणेश राजाराम हिवराळे (वय २८ वर्षे रा. शिवनगर, नांदेड), ज्ञानेश्वर नारायण ढगे (वय ५५ वर्षे रा. सैलानीनगर नांदेड) हे दोन दुचाकी व चांदीच्या दागिन्यांसह मिळून आल्याने त्यांना विश्वासात घेवून अधिक विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, लाल रंगाच्या स्कुटीवर बसून नाईकनगर येथे ऑटोतून उतरुन पायी जाणाऱ्या महिलेची पर्स जबरीने ओढून पळून गेले व त्यांनतर अण्णाभाऊ साठे चौकातून एक काळया रंगाची पॅशन-प्रो दुचाकीची चोरी करुन दोन्ही दुचाकी आणि चांदीचे दागिने विक्री करण्यासाठी जात असल्याचे सांगितल्याने नमूद आरोपीतांना जप्त मुद्देमालासह विमानतळ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## इकडचं तिकडचं

### मुडदा बशिवला त्या म्हागाईचा...

ग्रामीण भागातील सत्तरी ओलांडलेलं एक जोडपं दातांच्या ट्रिटमेंटसाठी नांदेडला आलं होतं. या वयात मोठी झालेली कर्ती-सवरती मुलं खेड्यात राहात नसल्याने दोघेच सकाळच्या एसटी बसने नांदेडला आले असावेत. नवरा एकदम मित्तभाषी असावा किंवा दातांच्या ट्रिटमेंटमुळे बिचाऱ्याला सक्तीचे मौन बाळगावे लागत असावे.

दातांची ट्रिटमेंट पूर्ण झाल्यावर डॉक्टर लेन परिसरातील एका हॉटेलमध्ये सोबत आणलेली शिदोरी खाण्यासाठी जोडपं गेलं. वेटरने बाहेरील खाद्यपदार्थ खाण्यास मनाई केल्यावर आज्जीबाई म्हणाल्या, आरं बाबा, जेवणं झाल्यावर ताक घेणार हावं की! केवढ्याला हाय ताकाचा गिलास? वेटर उत्तरला, फुल पंचवीस रुपये अन् हाफ पंधरा रुपये. उत्तर ऐकताच आज्जीमाय खेकसली, मुडदा बशिवला त्या म्हागाईचा अन् सरकारचा! गरिबानं जगावं की मरावं?

पेट्रोल, डिझेल व गॅस या इंधनाच्या दरवाढीचे चटके सामान्यांना कसे बसतात, याची दखल सरकार का घेत नसेल हा प्रश्न हॉटेलमध्ये उपस्थित सर्वांच्या मनात आला. आजूबाजूच्या टेबलवरील चर्चा ऐकत आम्ही आमचा चहा संपवला.

लहानपणी छोट्या गोष्टी नावाच्या एका पुस्तकात वाचले होते की, छत्रपती शिवाजी महाराज आपल्याच राज्यात वेष पालटून अंधारात फेरफटका मारत असत. जनतेची शिवराज्याविषयी मते स्वतः जाणून घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करत असत. छत्रपती शिवाजी महाराजांचा आशीर्वाद मागत त्यांचेच नाव वापरून सत्तारूढ झालेले लोकशाही सरकार असा प्रयोग करण्याची हिंमत का करत नसेल; असा प्रश्न आज्जीमायकडे बघून पडणारच ना?

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

# २५ हजारांची लाच घेताना तलाठी एसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा परिषद अंतर्गत करण्यात आलेल्या शासकीय बांधकामाच्या उर्वरित बिलाची रक्कम देण्यासाठी ४० हजारांपैकी २५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शनिवार, दि. १३ जून रोजी रंगेहात पकडले. ही कारवाई चैतन्यनगर भागात करण्यात आली.

किनवट तालुक्यातील पांगरी पहाड येथे ग्रामसेवक म्हणून मिलिंदराज शामराव दवणे (वय ३७) कार्यरत आहेत. तक्रारदार हे शासकीय कंत्राटदार असून त्यांनी संत सेवालाल महाराज सांस्कृतिक सभागृहाचे सुमारे दहा लाख रुपयांचे बांधकाम पूर्ण केले होते. या कामाच्या बिलापैकी ९ लाख १२८ रुपयांचा धनादेश देण्यात आला होता. मात्र उर्वरित रक्कम अदा करण्यासाठी आरोपी ग्रामसेवकाने बिलाच्या पाच टक्के प्रमाणे ५० हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली.

तक्रारीची पडताळणी करण्यात आल्यानंतर आरोपीने तडजोडीअंती ४० हजार रुपये स्वीकारण्यास संमती दिली. त्यानंतर शनिवारी सापळा रचण्यात आला. तक्रारदाराने आरोपीला सध्या २५ हजार रुपये उपलब्ध असल्याचे सांगितले असता आरोपीने चैतन्यनगर भागात असलेल्या एका दुकानात बोलावून घेतले.

सापळ्यादरम्यान आरोपीने २५ हजार रुपये दुकानातील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवण्यास सांगितले. तसेच उर्वरित १५ हजार रुपये ऑनलाईन पाठविल्यास लगेच धनादेश देतो असे सांगून तक्रारदाराकडून स्कॅनरद्वारे १५ हजार रुपये ऑनलाईन जमा करून घेतले. त्यानंतर आरोपीने धनादेशावर स्वाक्षरी करून ग्रामपंचायतीचा शिक्का मारत तक्रारदाराला धनादेश दिला.

यावेळी एसीबीच्या पथकाने कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीकडून २५ हजार रुपयांची लाचेची रक्कम, सॅमसंग एस-२५ अल्ट्रा मोबाईल, मराठवाडा ग्रामीण बँकेचे चेकबुक तसेच ग्रामपंचायत अधिकाऱ्याचा अधिकृत शिक्का जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षक माधुरी यावलीकर करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनात निरीक्षक अनिता दिनकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून, पोलीस उपअधीक्षक राहुल तरकसे यांनी पर्यवेक्षण केले.

## बालाजी पाटील यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – गोपाळचावडी येथील ज्येष्ठ नागरिक बालाजी भाऊराव सेलूकर पाटील यांचे १४ जून रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ४ वाजता गोपाळचावडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. गोपाळचावडी येथील ग्रामपंचायतचे उपसरपंच साहेबराव सेलूकर पाटील यांचे ते वडील होत.

## भिवाजी नवघरे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –कंधार तालुक्यातील शिरूर (नवे) येथील ज्येष्ठ नागरिक भिवाजी नामदेव नवघरे (वय ७५) यांचे रविवार, दि. १४ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी शिरूर (नवे) येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, नातू-नातवंडे असा परिवार आहे.

# विष्णुपुरी ग्रा.पं. निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या विष्णुपुरी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी येलमाटे यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी येथे १५ जागेसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी आजी-माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच पद हे सर्वसाधारण पुरूषांसाठी सोडण्यात आले असून, पंधरापैकी आठ जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार नांदेड तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी येलमाटे, तलाठी रमेश गिरी, ग्रामसेवक संजय कानोडे, ग्रामपंचायत कर्मचारी संतोष हंबर्डे, उग्रसेन हंबर्डे यांच्या उपस्थितीत जनगणना २०११ नुसार विष्णुपुरी येथील लोकसंख्या ८००० नुसार ५ वार्डतील १५ जागेकरिता आरक्षण सोडत काढण्यात आली.

यावेळी सरपंच प्रतिनिधी राजू हंबर्डे, उपसरपंच प्रतिनिधी विश्वनाथ हंबर्डे, सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे, शिवाजी हंबर्डे यांच्यासह आजी, माजी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वार्ड क्रमांक १ मध्ये एससी महिला राखीव, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण वार्ड क्रमांक २ एससी सर्वसाधारण, ओबीसी सर्व साधारण, सर्वसाधारण महिला, वार्ड क्रमांक ३ एससी महिला राखीव, नामाप्र महिला राखीव, सर्वसाधारण, वार्ड क्रमांक ४ सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण, सर्वसाधारण, वार्ड क्रमांक ५ सर्व साधारण, ओबीसी महिला राखीव, सर्वसाधारण महिला राखीव पंधरा जागेसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली आहे. सरपंच पद हे सर्वसाधारण पुरूषांसाठी सोडण्यात आले. आगामी निवडणूक अटीतटीची होणार असल्याचे समजते. ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे यांचीही यावेळी उपस्थिती होती. आरक्षण सोडत विद्यार्थ्याच्या हस्ते चिठ्ठी काढून काढण्यात आली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com